# गीताई

[ भगवद्-गीता मराठींत ]

सन १९५२

म. ग्रं. सं. ठाणे

विषय काव्य

सं. नं. १३१२

REFBK-0007848

REFBK-0007848

विनोबा

# गीताईची अधिकरण-माला

१ एक ऐतिह्य-कथन दोन दैन्य-प्रदर्शन ।
२ तीन कृष्णास शरण चार आत्म-प्रबोधन
पांच पाळूं स्व-धर्मास सहावा बुद्धि-योग तो
सात योगी स्थित-प्रज्ञ थोर आदर्श आमुचा ॥ १ ॥

३ आठ साधावया बुद्धि कर्म-योग अवश्यक
नौ नित्य-कर्म यज्ञार्थ दहावा लोक-संग्रह
अक्रा शासन हें पाळूं बारा वैऱ्यास संहरूं ।
४ तेरा दिव्य जन्म-कर्म चौदा कर्मीं अकर्मता
पंध्रा प्राज्ञ-मुखें ज्ञान जेथ मोह न संभवे ।
५ सोळा सांख्य योग एक सत्रा मुक्त सदा चि जो ॥ २ ॥

६ अठ्रा योगारूढ होऊं करूं उद्धार आपुला
नौदा समाधि-अभ्यास वीस योग्यास शाश्वती ।
७ एक्वीस् एक चि तें सूत्र बावीस् शरणता बरी
तेवीस् तोडूनियां मोह ज्ञान-विज्ञान-साधन ।
८ चोवीस् मरणपर्यंत राखूं स्मरण संतत
पंचवीस् भूत-लयोत्पत्ति सव्वीस् बोध-क्षयोदय ॥ ३ ॥

[कव्हर पृष्ठ ३ वर चालू]

# गीताई

[ भगवद्-गीता मराठींत ]

REFBK-0007848

गीताई माउली माझी तिचा मी बाळ नेणता
पडतां रडतां घेई उचलूनि कडेवरी ॥

विनोबा

प्रकाशक :
रामदासभाई,
मंत्री, ग्रामसेवा-मंडळ,
नालवाडी, वर्धा

आवृत्ति पंधरावी ५०००
पूर्ण संख्या २, ५५, ०००

आठ आणे

नोव्हेंबर १९५२

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाववाडी, मुंबई ४.

## नवव्या आवृत्तीची प्रस्तावना

गीताईची ही परिष्कृत आवृत्ति आहे. अध्यायांना विषय-निदर्शक नांवें दिलीं आहेत. ६० अधिकरणें कल्पिलीं आहेत. त्यांचे हि खंड आणि परिच्छेद पाडले आहेत. पाठ-संशोधन केलें आहे. विषयविवेचना-साठीं "गीता-प्रवचनें" आहेत च.

गीताई ही ईश्वरानें माझ्या हातून घडवलेली सर्वोत्तम सेवा मी समजलों आहें. तदनुसार माझें जीवन असो, असा सर्वांनीं मला आशीर्वाद द्यावा.

गोपुरी, नालवाडी
१ ऑगस्ट १९४५

विनोबा

## आवृत्ति दहावी

मुख्यतः खेडेगांवचे लोक, लहान मुलें, वृद्ध, आणि नवशिक्षित, ह्यांच्या उपयोगासाठीं गीताईची ही मोठ्या अक्षराची आवृत्ति काढली आहे. अनेकांची तशी मागणी होती. अपेक्षेप्रमाणें ती उपयोगी पडेल अशी मी आशा करतों.

परंधाम, पवनार
१ मार्च १९४८

विनोबा

---

## गीताईचा साप्ताहिक पाठ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| शुक्र | ... | अध्याय | १–२ | बुद्धियोग |
| शनि | ... | अध्याय | ३–५ | कर्मयोग |
| रवि | ... | अध्याय | ६–८ | ध्यानयोग |
| सोम | ... | अध्याय | ९–१२ | भक्तियोग |
| मंगळ | ... | अध्याय | १३–१५ | ज्ञानयोग |
| बुध | ... | अध्याय | १६–१७ | शुद्धियोग |
| गुरु | ... | अध्याय | १८ | अनासक्तियोग |

# अनुक्रमणिका

अध्याय


१ प्रास्ताविक आख्यायिका—अर्जुनाचा विषाद

२ सर्व उपदेश थोडक्यांत : आत्मज्ञान आणि समत्वबुद्धि

३ कर्मयोग

४ कर्मयोग-सहकारि-साधना : विकर्म

५ दुहेरी अकर्मावस्था : योग आणि संन्यास

६ चित्तवृत्ति-निरोध

७ प्रपत्ति अथवा ईश्वर-शरणता

८ प्रयाण-साधना : सातत्ययोग

९ मानव-सेवेची राजविद्या : समर्पणयोग

१० विभूति-चिंतन

११ विश्वरूप-दर्शन

१२ सगुण-निर्गुण-भक्ति

१३ आत्मानात्म-विवेक

१४ गुणोत्कर्ष आणि गुण-निस्तार

१५ पूर्णयोग : सर्वत्र पुरुषोत्तम-दर्शन

१६ परिशिष्ट १—दैवी आणि आसुरी वृत्तींचा झगडा

१७ परिशिष्ट २—साधकाचा कार्यक्रम

१८ उपसंहार—फलत्यागाची पूर्णता : ईश्वर-प्रसाद

# अध्याय पहिला

[१]

धृतराष्ट्र म्हणाला

१ त्या पवित्र कुरु-क्षेत्रीं पांडूचे आणि आमुचें
युद्धार्थ जमले तेव्हां वर्तलें काय संजया ॥

संजय म्हणाला

२ पाहिली पांडवी सेना सज्ज दुर्योधनें तिथें
मग गेला गुरूपाशीं त्यास हें वाक्य बोलिला ।

३ गुरुजी तुमचा शिष्य शाहणा द्रुपदात्मज
विशाळ रचिलें त्यानें पहा पांडव-सैन्य हें

४ ह्यांत शूर धनुर्धारी युद्धीं भीमार्जुनांसम
महा-रथी तो द्रुपद विराट-नृप सात्यकि

५ धृष्टकेतु तसा शूर काश्य तो चेकितान हि
पुरुजित् कुंतिभोजीय आणि शैब्य नरोत्तम

६ उत्तमौजा हि तो वीर युधामन्यु हि विक्रमी
सौभद्र आणि ते पुत्र द्रौपदीचे महा-रथी ।

७ आतां जे आमुच्यांतील सैन्याचे मुख्य नायक
सांगतों जाणण्यासाठीं घ्यावे लक्षांत आपण

८ स्वतां आपण हे भीष्म यशस्वी कृप कर्ण तो
अश्वत्थामा सौमदत्ति जयद्रथ विकर्ण हि

९ अनेक दुसरे वीर माझ्यासाठीं मरावया
सजले सर्व शस्त्रांनीं झुंजणारे प्रवीण जे ।

१० अफाट आमुचें सैन्य भीष्मांनीं रक्षिलें असे
मोजकें पांडवांचें हें भीमानें रक्षिलें असे

११ राहूनि आपुल्या स्थानीं जेथें ज्यास नियोजिलें
चहूंकडूनि भीष्मांस रक्षाल सगळे जण ।।

१२ हर्षवीत चि तों त्यास सिंह-नाद करूनियां
प्रतापी वृद्ध भीष्मांनीं मोठ्यानें शंख फुंकिला

१३ तत्क्षणीं शंखभेर्यादि रण-वाद्यें विचित्र चि
एकत्र झडलीं तेव्हां झाला शब्द भयंकर ।

१४ इकडे शुभ्र घोड्यांच्या मोठ्या भव्य रथांतुनी
माधवें अर्जुनें दिव्य फुंकिले शंख आपुले

१५ पांच-जन्य हृषीकेशें देव-दत्त धनंजयें
पौंड्र तो फुंकिला भीमें महा-शंख महा-बळें

१६ तेव्हां अनंत-विजय धर्मराज युधिष्ठिरें
नकुळें सहदेवें हि सुघोष मणि-पुष्पक ।

१७ मग काश्य धनुर्धारी शिखंडी हि महा-रथी
विराट आणि सेनानी तसा अजित सात्यकि

१८ राजा द्रुपद सौभद्र द्रौपदीचे हि पुत्र ते
सर्वांनीं फुंकिले शंख आपुले वेगवेगळे ।

१९ त्या घोषें कौरवांचीं तों हृदयें चि विदारिलीं
भरूनि भूमि आकाश गाजला तो भयंकर ।

२० मग नीट उभे सारे पुन्हां कौरव राहिले
चालणार पुढें शस्त्रें इतुक्यांत कपि-ध्वज
हातीं धनुष्य घेऊनि बोले कृष्णास वाक्य हें

अर्जुन म्हणाला

२१ दोन्ही सैन्यामधें कृष्णा माझा रथ उभा करीं
२२ म्हणजे कोण पाहीन राखिती युद्ध-कामना
आज ह्या रण-संग्रामीं कोणाशीं झुंजणें मज
२३ झुंजते वीर ते सारे घेतों पाहूनि येथ मी
युद्धीं त्या हत-बुद्धीचें जे करूं पाहती प्रिय।

संजय म्हणाला

२४ अर्जुनाचें असें वाक्य कृष्णें ऐकूनि शीघ्र चि
दोन्ही सैन्यांमधें केला उभा उत्तम तो रथ
२५ मग लक्षूनियां नीट भीष्म-द्रोण-नृपांस तो
म्हणे हे जमले पार्था पहा कौरव सर्व तूं
२६ तेथ अर्जुन तो पाहे उभे सारे व्यवस्थित
आजे काके तसे मामे सासरे सोयरे सखे
गुरु बंधु मुलें नातू दोन्ही सैन्यांत सारखे

२७ असे पाहूनि तो सारे सज्ज बांधव आपुले
अत्यंत करुणा-ग्रस्त विषादें वाक्य बोलिला ॥

## [ २ ]

### अर्जुन म्हणाला

२८ कृष्णा स्व-जन हे सारे युद्धीं उत्सुक पाहुनी
गात्रें चि गळती माझीं होतसे तोंड कोरडें
२९ शरीरीं सुटतो कंप उभे रोमांच राहती
गांडीव न टिके हातीं सगळी जळते त्वचा
३० न शकें चि उभा राहूं मन हें भ्रमलें जसें
३१ कृष्णा मी पाहतों सारीं विपरीत चि लक्षणें
कल्याण न दिसे युद्धीं स्व-जनांस वधूनियां ।
३२ नको जय नको राज्य नकोत मज तीं सुखें
राज्यें भोगें मिळे काय किंवा काय जगूनि हि
३३ ज्यांच्या साठीं अपेक्षावीं राज्य भोग सुखें हि तीं
सजले ते चि युद्धास धना-प्राणांस सोडुनी

३४ आजे बाप मुलें नातू आमुचे दिसती इथें
सासरे मेहुणे मामे संबंधी आणि हे गुरु
३५ न मारूं इच्छितों ह्यांस मारितील जरी मज
विश्व-साम्राज्य सोडीन पृथ्वीचा पाड तो किती।
३६ ह्या कौरवांस मारूनि कायसें आमुचें प्रिय
अत्याचारी जरी झाले ह्यांस मारूनि पाप चि
३७ म्हणूनि घात बंधूंचा आम्हां योग्य नव्हे चि तो
आम्हीं स्व-जन मारूनि सुखी व्हावें कसें बरें॥

३८ लोभानें नासली बुद्धि त्यामुळें हे न पाहती
मित्र-द्रोहीं कसें पाप काय दोष कुल-क्षयीं
३९ परी हें पाप टाळावें आम्हां कां समजूं नये
कुल-क्षयीं महा-दोष कृष्णा उघड पाहतां।
४० कुल-क्षयें लया जाती कुल-धर्म सनातन
धर्म-नाशें कुळीं सर्व अधर्म पसरे मग
४१ अधर्म माजतो तेव्हां भ्रष्ट होती कुल-स्त्रिया
स्त्रिया बिघडतां कृष्णा घडतो वर्ण-संकर

४२ संकरें नरका जाय कुलघ्नांसह तें कुळ
पितरांचा अधःपात होतसे श्राद्ध लोपुनी ।

४३ ह्या दोषांनीं कुलघ्नांच्या होउनी वर्ण-संकर
जातीचे बुडती धर्म कुळाचे हि सनातन

४४ ज्यांनीं बुडविले धर्म कुळाचे त्यांस निश्चित
नरकीं राहणें लागे आलों ऐकत हें असें ॥

४५ अरेरे केवढें पाप आम्हीं आरंभिलें असे
लोभें राज्य-सुखासाठीं मारावें स्व-जनांस जें

४६ त्याहूनि शस्त्र सोडूनि उगा राहीन तें बरें
मारोत मग हे युद्धीं शस्त्रांनीं मज कौरव ।

संजय म्हणाला

४७ असें रणांत बोलूनि शोकावेगांत अर्जुन
धनुष्य-बाण टाकूनि रथीं बैसूनि राहिला ॥

# अध्याय दुसरा

## [ २ ]

संजय म्हणाला

१ असा तो करुणा-ग्रस्त घाबरा अश्रु गाळित
करीत असतां खेद त्यास हें कृष्ण बोलिला ।

श्रीभगवान् म्हणाले

२ कोठूनि भलत्या वेळीं सुचलें पाप हें तुज
असें रुचे न थोरांस ह्यानें दुष्कीर्ति दुर्गति
३ निर्वीर्य तूं नको होऊं न शोभे हें मुळीं तुज
भिकार दुबळी वृत्ति सोडुनी ऊठ तूं कसा ॥

अर्जुन म्हणाला

४ कसा रणांगणीं झुंजूं भीष्म-द्रोणांविरुद्ध मी
ह्यांस बाण कसे मारूं आम्हां हे पूजनीय कीं
५ न मारितां थोर गुरूंस येथें
भिक्षा हि मागूनि भलें जगावें
हितेच्छु हे ह्यांस वधूनि भोग
भोगूं कसे भंगुर रक्त-मिश्र

६ ह्यांचा चि व्हावा जय आमुचा कीं
कशांत कल्याण असे न जाणों
मारूनि ज्यांतें जगणें न इच्छूं
झुंजावया ते चि उभे समोर

७ दैन्यानें ती मारिली वृत्ति माझी
धर्माचें तों नाशिलें ज्ञान मोहें
कैसें माझें श्रेय होईल सांगा
पायांपाशीं पातलों शिष्य-भावें

८ मिळेल निष्कंटक राज्य येथें
लाभेल इंद्रासन देव-लोकीं
शमेल त्यानें न तथापि शोक
जो इंद्रियांतें सुकवीत माझ्या ।

संजय म्हणाला

९ असें अर्जुन तो वीर हृषीकेशास बोलुनी
शेंवटीं मी न झुंजें चि ह्या शब्दें स्तब्ध राहिला

१० मग त्यास हृषीकेश जणूं हंसत बोलिला
करीत असतां शोक दोन्ही सैन्यांत तो तसा ॥

[४]

श्रीभगवान् म्हणाले

११ करिसी भलता शोक वरी ज्ञान हि सांगसी
मेल्याजित्याविषीं शोक ज्ञानवंत न जाणती
१२ मी तूं आणिक हे राजे न मागें नव्हतों कधीं
तसें चि सगळे आम्ही न पुढें हि नसूं कधीं
१३ ह्या देहीं बाल्य तारुण्य जरा वा लाभते जशी
तसा लाभे नवा देह न डगे धीर तो तिथें ।
१४ शीतोष्ण विषय-स्पर्श सुख-दुःखांत घालिती
करीं सहन तूं सारे येती जाती अनित्य ते
१५ ह्यांची मात्रा न चाले चि ज्या धीर पुरुषावरी
सम देखे सुखें दुःखें मोक्ष-लाभास योग्य तो ॥

१६ नसे मिथ्यास अस्तित्व नसे सत्यास नाश हि
निवाडा देखिला संतीं ह्या दोहींचा अशापरी
१७ ज्यानें हें व्यापिलें सर्व तें जाण अविनाश तूं
नाश त्या नित्य-तत्त्वाचा कोणी हि न करूं शके

१८ विनाशी देह हे सारे बोलिले त्यांत शाश्वत
नित्य निःसीम तो आत्मा अर्जुना झुंज ह्यास्तव।

१९ जो म्हणे मारितो आत्मा आणि जो मरतो म्हणे
दोघे न जाणती कांहीं न मारी न मरे चि हा

२० न जन्म पावे न कदापि मृत्यु
होऊनि मागें न पुढें न होय
आला न गेला स्थिर हा पुराणें
मारोत देहास परी मरे ना

२१ निर्विकार चि हा नित्य जन्म-मृत्यूंहुनी पर
जाणे हें तत्त्व तो कैसा मारी वा मारवी कुणा।

२२ सांडूनियां जर्जर जीर्ण वस्त्रें
मनुष्य घेतो दुसरीं नवीन
तशीं चि टाकूनि जुनीं शरीरें
आत्मा हि घेतो दुसरीं निराळीं

२३ शस्त्रें न चिरिती ह्यास ह्यास अग्नि न जाळितो
पाणी न भिजवी ह्यास ह्यास वारा न वाळवी

२४ चिरवे जाळवे ना हा भिजवे वाळवे हि ना
स्थिर निश्चळ हा नित्य सर्व-व्यापी सनातन

२५ न देखूं ये न चिंतूं ये बोलिला निर्विकार हा
जाणूनि ह्यापरी आत्मा शोक योग्य नसे तुज।

२६ अथवा पाहसी तूं हा मरे जन्मे प्रति-क्षणीं
तरी तुज कुठें येथें नसे शोकास कारण

२७ जन्मतां निश्चयें मृत्यु मरतां जन्म निश्चयें
म्हणूनि न टळे त्याचा व्यर्थ शोक करूं नको

२८ भूतांचें मूळ अव्यक्तीं मध्य तो व्यक्त भासतो
पुन्हां शेंवट अव्यक्तीं त्यामधें शोक कायसा।

२९ आश्चर्य जो साच चि ह्यास देखे
आश्चर्य जो देखत ह्यास वर्णी
आश्चर्य जो वर्णन तें हि ऐके
ऐके तरी शून्य चि जाणण्याचें।

३० वसे देहांत सर्वांच्या आत्मा अमर नित्य हा
म्हणूनि भूत-मात्रीं तूं नको शोक करूं कधीं॥

[५]

३१ स्वधर्म तो हि पाहूनि न योग्य डगणें तुज
धर्म-युद्धाहुनी कांहीं क्षत्रियास नसे भलें
३२ प्राप्त झालें अनायासें स्वर्गाचें द्वार मोकळें
क्षत्रियास महा-भाग्यें लाभतें युद्ध हें असें
३३ हें धर्म-युद्ध टाळूनि पापांत पडशील तूं
स्वधर्मासह कीर्तीस दूर सारूनियां स्वयें ।
३४ अखंड लोक गातील दुष्कीर्ति जगतीं तुझी
मानवंतास दुष्कीर्ति मरणाहूनि आगळी
३५ भिऊनि टाळिलें युद्ध मानितील महा-रथी
असूनि मान्य तूं ह्यांस तुच्छता पावशील कीं
३६ बोलितील तुझे शत्रु भलतें भलतें बहु
निंदितील तुझें शौर्य काय त्याहूनि दुःखद ।
३७ मेल्यानें भोगिसी स्वर्ग जिंकिल्यानें मही-तळ
म्हणूनि अर्जुना ऊठ युद्धास दृढ-निश्चयें
३८ हानि लाभ सुखें दुःखें हार जीत करीं सम
मग युद्धास हो सिद्ध न लागे पाप तें तुज ॥

[ ६ ]

३९ सांख्य-बुद्धि अशी जाण ऐक ती योग-बुद्धि तूं
तोडिशील जिनें सारीं कर्मांचीं बंधनें जगीं

४० न बुडे येथ आरंभ न घडे विपरीत हि
जोडा स्वल्प हि हा धर्म तारी मोठ्या भयांतुनी

४१ ह्यांत निश्चय लाभूनि बुद्धि एकाग्र राहते
निश्चयाविण बुद्धीचे फाटे ते संपती चि ना।

४२ अविवेकी वृथा वाणी बोलती फुलवूनियां
वेदाचे घालिती वाद म्हणती दुसरें नसे

४३ जन्मूनियां करा कर्में मिळवा भोग-वैभव
भोगा कर्म-फळें गोड सांगती स्वर्ग-कामुक

४४ त्यामुळें भुलली बुद्धि गुंतली भोग-वैभवीं
ती निश्चय न लाभूनि समाधींत नव्हे स्थिर।

४५ तिन्ही गुण वदे वेद त्यांत राहें अलिप्त तूं
सत्त्व सोडूं नको सोशीं द्वंद्वें निश्चिंत सावध

४६ सर्वत्र भरलें पाणी तेव्हां आडांत अर्थ जो
विज्ञानी ब्रह्म-वेत्त्यास सर्व वेदांत अर्थ तो ॥

४७ कर्मांत चि तुझा भाग तो फळांत नसो कधीं
नको कर्म-फळीं हेतु अकर्मीं वासना नको
४८ फळ लाभो न लाभो तूं निःसंग सम होउनी
योग-युक्त करीं कर्मे योग-सार समत्व चि ।
४९ समत्व-बुद्धि ही थोर कर्म तीहूनि हीन चि
बुद्धीचा आसरा घे तूं मागती फळ दीन ते
५० येथें समत्व-बुद्धीनें टळे सुकृत-दुष्कृत
समत्व जोड ह्यासाठीं तें चि कर्मांत कौशल
५१ ज्ञानी समत्व-बुद्धीनें कर्माचें फळ सोडुनी
जन्माचे तोडिती बंध पावती पद अच्युत ।
५२ लंघूनि बुद्धि जाईल जेव्हां हा मोह-कर्दम
आलें येईल जें कानीं तेव्हां जिरविशील तूं
५३ श्रवणें भ्रमली बुद्धि तुझी लाभूनि निश्चय
स्थिरावेल समाधींत तेव्हां भेटेल योग तो ॥

[ ७ ]

अर्जुन म्हणाला

५४ स्थिरावला समाधींत स्थित-प्रज्ञ कसा असे
कृष्णा सांग कसा बोले कसा राहे फिरे कसा ।

श्रीभगवान् म्हणाले

५५ कामना अंतरांतील सर्व सोडूनि जो स्वयें
आत्म्यांत चि असे तुष्ट तो स्थित-प्रज्ञ बोलिला ।

५६ नसे दुःखांत उद्वेग सुखाची लालसा नसे
नसे तृष्णा भय क्रोध तो स्थित-प्रज्ञ संयमी

५७ सर्वत्र जो अनासक्त बरें वाईट लाभतां
न उल्लासे न संतापे त्याची प्रज्ञा स्थिरावली

५८ घेई ओढूनि संपूर्ण विषयांतूनि इंद्रियें
जसा कासव तो अंगें तेव्हां प्रज्ञा स्थिरावली ।

५९ निराहार-बळें बाह्य सोडी विषय साधक
आंतील न सुटे गोडी ती जळे आत्म-दर्शनें

६० करीत असतां यत्न ज्ञात्याच्या हि मनास हीं
नेती खेंचूनि वेगानें इंद्रियें दांडगीं चि कीं

६१ त्यांस रोधूनि युक्तीनें रहावें मत्परायण
इंद्रियें जिंकिलीं ज्यानें त्याची प्रज्ञा स्थिरावली ।

६२ विषयांचें करी ध्यान त्यास तो संग लागला
संगांतूनि फुटे काम क्रोध कामांत ठेविला

६३ क्रोधांतूनि जडे मोह मोहानें स्मृति लोपली
स्मृति-लोपें बुद्धि-नाश म्हणजे आत्म-नाश चि

६४ राग-द्वेष परी जातां आलीं हातांत इंद्रियें
स्वामित्वें विषयीं वर्ते त्यास लाभे प्रसन्नता

६५ प्रसन्नतेपुढें सर्व दुःखें जाती झडूनियां
प्रसन्नतेनें बुद्धीची स्थिरता शीघ्र होतसे ।

६६ अयुक्तास नसे बुद्धि त्यामुळें भावना नसे
म्हणूनि न मिळे शांति शांतीविण कसें सुख

६७ इंद्रियें वर्तता स्वैर त्यांमागें मन जाय जें
त्यानें प्रज्ञा जशी नौका वाऱ्यानें खेंचली जळीं

६८ म्हणूनि इंद्रियें ज्यानें विषयांतूनि सर्वथा
ओढूनि घेतलीं आंत त्याची प्रज्ञा स्थिरावली ।

६९ सर्व भूतांस जी रात्र जागतो संयमी तिथें
सर्व भूतें जिथें जागीं ज्ञानी योग्यास रात्र ती

७० न भंग पावे भरतां हि नित्य
समुद्र घेतो जिरवूनि पाणी
जाती तसे ज्यांत जिरूनि भोग
तो पावला शांति न भोग-लुब्ध

७१ सोडूनि कामना सर्व फिरे होऊनि निःस्पृह
अहंता ममता गेली झाला तो शांति-रूप चि ।

७२ अर्जुना स्थिति ही ब्राह्मी पावतां न चळे पुन्हां
टिकूनि अंत-काळीं हि ब्रह्म-निर्वाण मेळवी ।।

# अध्याय तिसरा

## [८]

अर्जुन म्हणाला

१ बुद्धि कर्माहुनी थोर मानिसी तूं जनार्दना
मग कर्मांत कां घोर घालिसी मज केशवा

२ मिश्र बोलूनि बुद्धीस जणूं मोहांत टाकिसी
ज्यानें मी श्रेय पावेन सांग तें एक निश्चित।

श्रीभगवान् म्हणाले

३ दुहेरी ह्या जगीं निष्ठा पूर्वीं मी बोलिलों असें
ज्ञानानें सांख्य जी पावे योगी कर्म करूनियां

४ न कर्मारंभ टाळूनि लाभे नैष्कर्म्य तें कधीं
संन्यासाच्या क्रियेनें चि कोणी सिद्धि न मेळवी

५ कर्माविण कधीं कोणी न राहे क्षण-मात्र हि
प्रकृतीच्या गुणीं सारे बांधिले करितात चि।

६ इंद्रियें करिती कर्म मूढ त्यांस चि रोधुनी
राहतो भोग चिंतूनि तो मिथ्याचार बोलिला
७ जो इंद्रियें मनानें तीं नेमुनी त्यांस राबवी
कर्म-योगांत निःसंग तो विशेष चि मानिला
८ नेमिलें तूं करीं कर्म करणें हें चि थोर कीं
तुझी शरीर-यात्रा हि कर्मांविण घडे चि ना ॥

[९]

९ यज्ञार्थ कर्म सोडूनि लोक हा बांधिला असे
यज्ञार्थ आचरीं कर्म अर्जुना मुक्त-संग तूं ।
१० पूर्वीं प्रजेसवें ब्रह्मा यज्ञ निर्मूनि बोलिला
पावा उत्कर्ष यज्ञानें हा तुम्हां काम-धेनु चि
११ रक्षा देवांस यज्ञानें तुम्हां रक्षोत देव ते
एकमेकांस रक्षूनि पावा कल्याण सर्व हि
१२ यज्ञ-तुष्ट तुम्हां देव भोग देतील वांछित
त्यांचें त्यांस न देतां जो खाय तो एक चोर चि ।
१३ यज्ञांत उरलें खाती संत ते दोष जाळिती
रांधिती आपुल्यासाठीं पापी ते पाप भक्षिती ॥

१४ अन्नापासूनि हीं भूतें पर्जन्यांतूनि अन्न तें
यज्ञें पर्जन्य तो होय यज्ञ कर्मामुळें घडे
१५ प्रकृतीपासुनी कर्म ब्रह्मीं प्रकृति राहिली
ऐसें व्यापक तें ब्रह्म यज्ञांत भरलें सदा
१६ प्रेरिलें हें असें चक्र ह्या लोकीं जो न चालवी
इंद्रियासक्त तो पापी व्यर्थ जीवन घालवी ॥

१७ परी आत्म्यांत जो खेळे आत्मा भोगूनि तृप्त जो
आत्म्यामध्यें चि संतुष्ट त्याचें कर्तव्य संपलें
१८ केल्यानें वा न केल्यानें त्यास भावार्थ सारखा
कोणामधें कुठें त्याचा न कांहीं लोभ गुंतला ।
१९ म्हणूनि नित्य निःसंग करीं कर्तव्य कर्म तूं
निःसंग करितां कर्म कैवल्य-पद पावतो ॥

[१०]

२० कर्म-द्वारा चि सिद्धीस पावले जनकादिक
करीं तूं कर्म लक्षूनि लोक-संग्रह-धर्म हि
२१ जें जें आचरितो श्रेष्ठ तें तें चि दुसरे जन
तो मान्य करितो जें जें लोक चालवितात तें ।

२२ करावें-मिळवावेंसें नसे कांहीं जरी मज
तिन्ही लोकीं तरी पार्था कर्मीं मी वागतों चि कीं
२३ मी चि कर्मीं न वागेन जरी आळस झाडुनी
सर्वथा लोक घेतील माझें वर्तन तें मग
२४ सोडीन मी जरी कर्म नष्ट होतील लोक हे
होईन संकर-द्वारा मी चि घातास कारण ।
२५ गुंतूनि करिती अज्ञ ज्ञात्यानें मोकळेपणें
करावें कर्म तैसें चि इच्छुनी लोक-संग्रह
२६ नेणत्या कर्म-निष्ठांचा बुद्धि-भेद करूं नये
गोडी कर्मांत लावावी समत्वें आचरूनि तीं ।
२७ कर्में होतात हीं सारीं प्रकृतीच्या गुणांमुळें
अहंकार-बळें मूढ कर्ता मी हें चि घेतसे
२८ गुण हे आणि हीं कर्में ह्यांहुनी वेगळा चि मी
जाणे तत्त्व-ज्ञ गुंते ना गुणांत गुण वागतां
२९ गुंतले गुण-कर्मीं जे भुलले प्रकृती-गुणें
त्या अल्प जाणणारांस सर्व-ज्ञें चाळवूं नये ॥

[११]

३० मज अध्यात्म-वृत्तीनें सर्व कर्मै समर्पुनी
फलाशा ममता सर्व सोडुनी झुंज तूं सुखें
३१ माझें शासन हें नित्य जे निर्मत्सर पाळिती
श्रद्धेनें नेणते ते हि तोडिती कर्म-बंधनें
३२ परी मत्सर-बुद्धीनें जे हें शासन मोडिती
ज्ञान-शून्य चि ते मूढ पावले नाश जाण तूं ।
३३ ज्ञानी हि वागतो त्याच्या स्वभावास धरूनियां
स्वभाव-वश हीं भूतें बलात्कार निरर्थक
३४ इंद्रियीं सेवितां अर्थ राग-द्वेष उभे तिथें
वश होऊं नये त्यांस ते मार्गांतील चोर चि
३५ उणा हि आपुला धर्म पर-धर्माहुनी बरा
स्व-धर्मांत भला मृत्यु पर-धर्म भयंकर ॥

[१२]

अर्जुन म्हणाला

३६ मनुष्य करितो पाप कोणाच्या प्रेरणेमुळें
आपुली नसतां इच्छा वेठीस धरिला जसा ।

श्रीभगवान् म्हणाले

३७ काम हा आणि हा क्रोध घडिला जो रजोगुणें
मोठा खादाड पापिष्ठ तो वैरी जाण तूं इथें ।

३८ धुरानें झांकिला अग्नि धुळीनें आरसा जसा
वारेनें वेष्टिला गर्भ कामानें ज्ञान हें तसें

काम-रूप महा-अग्नि नव्हे तृप्त कधीं चि जो
जाणत्याचा सदा वैरी त्यानें हें ज्ञान झांकिलें

४० घेऊनि आसऱ्यासाठीं इंद्रियें मन बुद्धि तो
मोह पाडी मनुष्यातें त्याच्या ज्ञानास गुंडुनी ।

४१ म्हणूनि पहिला थारा इंद्रियें तीं चि जिंकुनी
टाळीं पाप्यास जो नाशी ज्ञान विज्ञान सर्व हि

४२ इंद्रियें बोलिलीं थोर मन त्यांहूनि थोर तें
बुद्धि थोर मनाहूनि थोर तीहूनि तो प्रभु

४३ असा तो प्रभु जाणूनि आवरीं आप आपणा
संहारीं काम हा वैरी तूं गांठूनि परोपरी ॥

# अध्याय चौथा

## [ १३ ]

श्रीभगवान् म्हणाले

१ योग हा अविनाशी मी स्वयें सूर्यास बोलिलों
मनूस बोलिला सूर्य तो इक्ष्वाकूस त्यापरी
२ अशा परंपरेंतूनि हा राजर्षींस लाभला
पुढें काळ-बळानें तो ह्या लोकीं योग लोपला
३ तो चि हा बोलिलों आज तुज योग पुरातन
जीवींचें गूज हें थोर तूं हि भक्त सखा तसा ॥

अर्जुन म्हणाला

४ ह्या काळचा तुझा जन्म सूर्याचा तो पुरातन
तूं बोलिलास आरंभीं हें मी जाणूं कसें बरें ।

श्रीभगवान् म्हणाले

५ माझे अनेक ह्यापूर्वीं झाले जन्म तसे तुझे
जाणतों सगळे मी ते अर्जुना तूं न जाणसी ।

६ असूनि हि अजन्मा मी निर्विकार जगत्-प्रभु
माझी प्रकृति वेढूनि मायेनें जन्मतों जणूं

७ गळूनि जातसे धर्म ज्या ज्या वेळेस अर्जुना
अधर्म उठतो भारी तेव्हां मी जन्म घेतसें

८ राखावया जगीं संतां दुष्टां दूर करावया
स्थापावया पुन्हां धर्म जन्मतों मी युगीं युगीं ।

९ जन्म-कर्में अशीं दिव्य जो माझीं नीट ओळखे
देह गेल्या पुन्हां जन्म न पावे भेटुनी मज

१० नाहीं तृष्णा भय क्रोध माझ्या सेवेंत तन्मय
झाले ज्ञान-तपें चोख अनेक मज पावले ॥

११ भजती मज जे जैसे भजें तैसा चि त्यांस मी
माझ्या मार्गास हे येती लोक कोणीकडूनि हि

१२ जे कर्म-सिद्धि वांछूनि यजिती येथ दैवतें
मनुष्य-लोकीं कर्मांचें पावती फळ शीघ्र ते

१३ निर्मिले वर्ण मीं चारी गुण-कर्में विभागुनी
करूनि सर्व हें जाण अकर्ता निर्विकार मी ।

१४ कर्में न बांधिती मातें फळीं इच्छा नसे मज
माझें स्वरूप हें जाणे तो कर्मांत हि मोकळा
१५ केलीं कर्में मुमुक्षूंनीं पूर्वीं हें तत्त्व जाणुनी
तैसीं तूं हि करीं कर्में त्यांचा घेऊनि तो धडा ॥

[१४]

१६ नेणती जाणते ते हि काय कर्म अकर्म हें
तुज तें सांगतों कर्म जाणूनि सुटशील जें
१७ सामान्य कर्म जाणावें विकर्म हि विशेष जें
अकर्म तें हि जाणावें कर्माचें तत्त्व खोल हें
१८ कर्मीं अकर्म जो पाहे अकर्मीं कर्म जो तसें
तो बुद्धिमंत लोकांत तो योगी कृत-कृत्य तो ॥

१९ उद्योग करितो सारे काम-संकल्प सोडुनी
ज्ञानानें जाळिलीं कर्में म्हणती त्यास पंडित
२० नित्य-तृप्त निराधार न राखे फल-वासना
गेला गढूनि कर्मांत तरी कांहीं करी चि ना
२१ संयमी सोडुनी सर्व इच्छेसह परिग्रह
शरीरें चि करी कर्म दोष त्यास न लागतो

२२ मिळे तें चि करी गोड न जाणे द्वंद्व मत्सर
फळो जळो जया एक करूनि हि न बांधिला

२३ ज्ञानांत बैसली वृत्ति संग सोडूनि मोकळा
यज्ञार्थ करितो कर्म जाय सर्व जिरूनि तें

२४ ब्रह्मांत होमिलें ब्रह्म ब्रह्मानें ब्रह्म लक्षुनी
ब्रह्मीं मिसळलें कर्म तेव्हां ब्रह्म चि पावला ॥

२५ देवताराधनें यज्ञ योगी कोणी अनुष्ठिती
ब्रह्माग्नींत तसे कोणी यज्ञें यज्ञत्व जाळिती

२६ श्रोत्रादि इंद्रियें कोणी संयमाग्नींत होमिती
कोणी विषय शब्दादि इंद्रियाग्नींत अर्पिती

२७ प्राणेंद्रिय-क्रिया कोणी सर्व होमूनि टाकिती
चिंतनानें समाधीस अंतरीं चेतवूनियां

२८ द्रव्यें जपें तपें योगें चिंतनें वा अशापरी
संयमी यजिती यज्ञ व्रतें प्रखर राखुनी ।

२९ होमिती एकमेकांत कोणी प्राण-अपान ते
रोधूनि गति दोहोंची प्राणायामास साधिती

३० प्राणांत होमिती प्राण कोणी आहार तोडुनी
यज्ञ-वेत्ते चि हे सारे यज्ञानें दोष जाळिती ।

३१ यज्ञ-शेषामृतें धाले पावले ब्रह्म शाश्वत
न यज्ञाविण हा लोक कोठूनि पर-लोक तो

३२ विशेष बोलिले वेदें असे यज्ञ अनेक हे
कर्मानें घडिले जाण जाणूनि सुटशील तूं ॥

[१५]

३३ द्रव्य-यज्ञादिकांहूनि ज्ञान-यज्ञ चि थोर तो
पावती सगळीं कर्मे अंतीं ज्ञानांत पूर्णता

३४ सेवा करूनि तें जाण नम्र-भावें पुसूनियां
ज्ञानोपदेश देतील ज्ञानी अनुभवी तुज ।

३५ ज्या ज्ञानानें असा मोह न पुन्हां पावशील तूं
आत्म्यांत आणि माझ्यांत भूतें निःशेष देखुनी
३६ जरी पाप्यांमधें पापी असशील शिरो-मणि
तरी ह्या ज्ञान-नौकेनें पाप तें तरशील तूं
३७ संपूर्ण पेटला अग्नि काष्ठें जाळूनि टाकितो
तसा ज्ञानाग्नि तो सर्व कर्में जाळूनि टाकितो ।
३८ ज्ञानासम नसे कांहीं पवित्र दुसरें जगीं
योग-युक्त यथा-काळीं तें पावे अंतरीं स्वयें
३९ श्रद्धेनें मेळवी ज्ञान संयमी नित्य-सावध
ज्ञानानें शीघ्र तो पावे शांति शेंवटची मग
४० नसे ज्ञान नसे श्रद्धा संशयी नासला पुरा
न हा लोक न तो लोक न पावे सुख संशयी।
४१ योगानें झाडिलीं कर्में ज्ञानें संशय तोडिले
जो सावधान आत्म्यांत कर्में त्यास न बांधिती
४२ म्हणूनि अंतरांतील अज्ञान-कृत संशय
तोडुनी ज्ञान-खड्गानें ऊठ तूं योग साधुनी ॥

# अध्याय पांचवा

[ १६ ]

अर्जुन म्हणाला

१ कृष्णा संन्यास कर्मांचा तसा योग हि सांगसी
दोहोंत जें बरें एक सांग तें मज निश्चित ।

श्रीभगवान् म्हणाले

२ योग संन्यास हे दोन्ही मोक्ष-साधक सारखे
विशेष चि परी योग संन्यासाहूनि मानिला ।

३ तो जाण नित्य-संन्यासी राग-द्वेष नसे जया
जो द्वंद्वावेगळा झाला सुखें बंधांतुनी सुटे

४ म्हणती सांख्य-योगांतें भिन्न मूढ न जाणते
बाणो एक हि ती निष्ठा दोहींचें फळ देतसे

५ सांख्यांस जें मिळे स्थान तें योग्यांस हि लाभतें
एक-रूप चि हे दोन्ही जो पाहे तो चि पाहतो ।

६ योगावांचूनि संन्यास कधीं साधे चि ना सुखें
संयमी योग जोडूनि ब्रह्म शीघ्र चि गांठतो ॥

७ अंतरीं धुतला योगी जिंकूनि मन इंद्रियें
झाला जीव चि भूतांचा करूनि हि अलिप्त तो

८ न कांहीं मी करीं ऐसें योगी तत्त्व-ज्ञ जाणुनी
देखे ऐके शिवे हुंगे खाय जाय निजे श्वसे

९ बोले सोडी धरी किंवा पापणी हालवी जरी
इंद्रियें आपुल्या अर्थीं वागती हें चि पाहतो।

१० ब्रह्मीं ठेवूनियां कर्में संग सोडूनि जो करी
पापें न लिप्त तो होय पद्म-पत्र जसें जळें

११ देहा-मनानें बुद्धीनें इंद्रियांनीं हि केवळ
आत्म-शुद्ध्यर्थ निःसंग योगी कर्म अनुष्ठिती

१२ युक्त तो फळ सोडूनि शांति निश्चळ पावतो
अयुक्त स्वैर-वृत्तीनें फळीं आसक्त बांधिला ॥

[ १७ ]

१३ मनानें सगळीं कर्में सोडुनी संयमी सुखें
नव-द्वार-पुरीं राहे करी ना करवी हि ना

१४ न कर्तेपण लोकांचें न कर्मे निर्मितो प्रभु
न कर्मीं फल-संयोग स्वभावें सर्व होतसे

१५ न घे पाप हि कोणाचें न वा पुण्य हि तो विभु
अज्ञानें झांकिलें ज्ञान त्यामुळें जीव मोहित

१६ गेलें अज्ञान तें ज्यांचें आत्म-ज्ञानें तयां मग
पर-ब्रह्म दिसे स्वच्छ जणूं सूर्यें प्रकाशिलें

१७ रंगले त्यांत ओतूनि बुद्धि निश्चय जीवन
पुन्हां येती न माघारे ज्ञानें पाप धुऊनियां ।

१८ विद्या-विनय-संपन्न द्विज गाय तसा गज
श्वान चांडाळ हे सारे तत्त्व-ज्ञ सम पाहती

१९ इथें चि जिंकिला जन्म समत्वीं मन रोवुनी
निर्दोष सम जें ब्रह्म झाले तेथें चि ते स्थिर

२० प्रिय-लाभें नको हर्ष नको उद्वेग अप्रियें
बुद्धि निश्चळ निर्मोह ब्रह्मीं ज्ञानी स्थिरावला ।

२१ विटला विषयीं जाणे अंतरीं सुख काय तें
ब्रह्मीं मिसळला तेव्हां भोगी तें सुख अक्षय

२२ विषयांतील जे भोग ते दुःखास चि कारण
येती जसे तसे जाती विवेकी न रमे तिथें

२३ प्रयत्नें मरणापूर्वीं ह्या देहीं जिरवूं शके
काम-क्रोधांतले वेग तो योगी तो खरा सुखी।

२४ प्रकाश स्थिरता सौख्य अंतरीं लाभलीं जया
ब्रह्म होऊनि तो योगी ब्रह्म-निर्वाण मेळवी

२५ फिटले दोष शंका हि मुठींत धरिलें मन
पावले ब्रह्म-निर्वाण ज्ञानी विश्व-हितीं रत

२६ काम-क्रोधांस जिंकूनि यत्नें चित्तास बांधिती
देखती ब्रह्म-निर्वाण आत्म-ज्ञानी चहूंकडे ॥

२७ विषयांचा बहिष्कार डोळा भ्रू-संगमीं स्थिर
करूनि नासिका-स्थानीं प्राणापान हि सारखे

२८ आवरी मुनि मोक्षार्थी इंद्रियें मन बुद्धि जो
सोडी इच्छा भय क्रोध सर्वदा सुटला चि तो।

२९ भोक्ता यज्ञ-तपांचा मी सोयरा विश्व-चालक
जाणूनि ह्यापरी मातें शांतीस वरिला चि तो ॥

# अध्याय सहावा

## [१८]

श्रीभगवान् म्हणाले

१ फळीं आश्रय सोडूनि करी कर्तव्य कर्म जो
तो संन्यासी तसा योगी न जो निर्यज्ञ निष्क्रिय
२ संन्यास म्हणती ज्यास योग तो जाण पाडवा
सोडिल्याविण संकल्प कोणी योगी न होतसे।
३ योगावरी चढूं जाता कर्म साधन बोलिलें
योगीं आरूढ तो होतां शम साधन बोलिलें
४ कर्मांत जो अनासक्त विरक्त विषयीं असे
संकल्प सुटले तेव्हां तो योगारूढ बोलिला॥

५ उद्धरावा स्वयें आत्मा खचूं देऊं नये कधीं
आत्मा चि आपुला बंधु आत्मा चि रिपु आपुला
६ जिंकूनि घेतला आत्मा बंधु तो होय आपुला
सोडिला तो जरी स्वैर शत्रुत्व करितो स्वयें।
७ जितात्मा शांत जो झाला देखे ब्रह्म चि एकलें
मानापमानीं शीतोष्णीं सुख-दुःखीं समावलें

८ तोषला ज्ञान-विज्ञानें स्थिर जिंकूनि इंद्रियें
तो योगी सम जो देखे सोनें पाषाण मृत्तिका
९ शत्रु मित्र उदासीन मध्यस्थ परका सखा
असो साधु असो पापी सम पाहे विशेष तो ॥

[ ११ ]

१० साधकें चित्त बांधूनि इच्छा संग्रह सोडुनी
आत्म्यास नित्य जोडावें एकातीं एकलेपणें
११ पवित्र स्थान पाहूनि घालावें स्थिर आसन
दर्भ चर्म वरी वस्त्र न घ्यावें उंच नीच तें
१२ चित्तेंद्रियांचे व्यापार वारावे तेथ बैसुनी
आत्म-शुद्ध्यर्थ जोडावा योग एकाग्र मानसें
१३ शरीर सम-रेखेंत राखावें स्थिर निश्चळ
दृष्टि ठेवूनि नासाग्रीं न पहावें कुणीकडे
१४ शांत निर्भय मच्चित्त ब्रह्मचर्य-व्रतीं स्थिर
मन रोधूनि युक्तीनें रहावें मत्परायण
१५ असें आत्म्यास जोडूनि योगी आवरिला मनें
मोक्षास भिडली शांति माझ्या ठाईं चि मेळवी ॥

१६ न योग फार खाऊनि किंवा खाणें चि सोडुनी
न फार झोंप घेऊनि किंवा जागत बैसुनी
१७ निजणें जागणें खाणें फिरणें आणि कार्य हि
मोजूनि करितो त्यास योग हा दुःख-नाशन॥

१८ संपूर्ण नेमिलें चित्त आत्म-रूपीं चि रंगला
निमाली वासना तेव्हां योगी तो युक्त बोलिला
१९ निर्वातीं ठेविला दीप तेवतो एकसारखा
तसें आत्मानुसंधानीं योग्याचें चित्त वर्णिती।
२० निरोधें जेथ चित्ताचा सर्व संचार संपला
जेथ भेटूनि आत्म्यातें अंतरीं तोषला स्वयें
२१ भोगूनि इंद्रियातीत बुद्धि-गम्य महा-सुख
न ढळे चि कधीं जेथ तत्त्वापासूनि लेश हि
२२ जया लाभापुढें लाभ दुसरा तुच्छ लेखितो
न चळे जेथ राहूनि दुःख-भारें हि दाटला
२३ तयास म्हणती योग दुःखाचा जो वियोग चि
जोडावा निश्चयानें तो योग उत्साह राखुनी॥

२४ संकल्पीं उठिले सारे काम निःशेष सोडुनी
इंद्रियें हीं मनानें चि ओढूनि विषयांतुनी

२५ धरूनि धीर बुद्धीनें निवर्तावें हळू हळू
आत्म्यांत मन रोवूनि कांहीं चिंतू नये स्वयें

२६ फुटेल जेथजेथूनि मन चंचळ अस्थिर
तेथतेथूनि बांधूनि लावावें आत्म-चिंतनीं।

२७ विकारांसह तें ज्याचें शमलें मन निर्मळ
झाला ब्रह्म चि तो योगी पावला सुख उत्तम

२८ आत्म्यास नित्य जोडूनि ह्यापरी दोष जाळुनी
सुखें चि भोगितो योगी ब्रह्मानंद अपार तो ॥

२९ भूतांत भरला आत्मा भूतें आत्म्यांत राहिलीं
योगानें जोडिला देखे हें चि सर्वत्र दर्शन

३० मज सर्वांत जो पाहे पाहे माझ्यांत सर्व हि
त्याचा मी आणि तो माझा एकमेकांस अक्षय

३१ स्थिर होऊनि एकत्वीं सर्व-भूतीं भजे मज
राहो कसा हि तो योगी माझ्या मध्यें चि राहतो

३२ जो आत्मौपम्य-बुद्धीनें सर्वत्र सम पाहतो
जसें सुख तसें दुःख तो योगी थोर मानिला ॥

[२०]

अर्जुन म्हणाला

३३ तूं बोलिलास जो आतां साम्य-योग जनार्दना
न देखें स्थिरता त्याची ह्या चंचळ मनामुळें

३४ मन चंचळ हें कृष्णा हट्टी छळितसे बळें
धांवे वाऱ्यावरी त्याचा दिसे निग्रह दुष्कर ।

श्रीभगवान् म्हणाले

३५ अवश्य मन दुःसाध्य म्हणतोस तसें चि तें
परी अभ्यास-वैराग्यें त्याचा निग्रह होतसे

३६ संयमाविण हा योग न साधे मानितों चि मी
परी संयमवंतास उपायें साध्य होतसे ॥

अर्जुन म्हणाला

३७ श्रद्धा आहे नव्हे यत्न योगांतूनि चळूनि जो
मुकला योग-सिद्धीस जाय कोण्या गतीस तो

३८ काय तो उभय-भ्रष्ट ब्रह्म-मार्गीं भुलूनियां
नाश पावे निराधार फुटलेल्या ढगापरी

३९ माझा संशय हा कृष्णा तूं चि फेडीं मुळांतुनी
फेडीलसा दुजा कोणी न दिसे चि तुझ्या विण ।

श्रीभगवान् म्हणाले·

४० न ह्या लोकीं न त्या लोकीं नाश तो पावतो कधीं
शुभकारी कुणी बापा दुर्गतीस न जातसे

४१ पुण्य-लोकांत राहूनि तो योग-भ्रष्ट संतत
शुचि साधनवंतांच्या घरीं जन्मास येतसे

४२ अथवा प्राज्ञ योग्यांच्या कुळीं चि मग जन्मतो
अवश्य हा असा जन्म लोकीं अत्यंत दुर्लभ

४३ तिथें तो पूर्व-जन्मींचा बुद्धि-संस्कार जोडुनी
मोक्षार्थ करितो यत्न पूर्वींहूनि पुढें पुन्हां

४४ पूर्वाभ्यास-बळानें तो खेंचला पर-तंत्र चि
जिज्ञासेनें हि योगाच्या जातो वेदांस लंघुनी

४५ योगी तत्पर राहूनि दोष जाळित जाळित
अनेक जन्मीं संपूर्ण होउनी मोक्ष पावतो ॥

४६ ज्ञानी तापस कर्मिष्ठ ह्या सर्वांहूनि आगळा
मानिला तो असे योगी योगी होईं म्हणूनि तूं

४७ सर्व योग्यांमधें योगी जीव माझ्यांत ठेवुनी
श्रद्धेनें भजतो मातें तो थोर मज वाटतो ॥

# अध्याय सातवा

[ २१ ]

श्रीभगवान् म्हणाले

१ प्रीतीनें आसरा माझा घेउनी योग साधित
जाणशील कसें ऐक समग्र मज निश्चित
२ विज्ञानासह तें ज्ञान संपूर्ण तुज सांगतों
जें जाणूनि पुढें येथें जाणावेंसें न राहतें
३ लक्षावधींत एखादा मोक्षार्थ झटतो कधीं
झटणाऱ्यांत एखादा तत्त्वतां जाणतो मज ।

४ पृथ्वी आप तसें तेज वायु आकाश पांचवें
मन बुद्धि अहंकार अशी प्रकृति अष्ट-धा
५ ही झाली अपरा माझी दुसरी जाण ती परा
जीव-रूपें जिनें सारें जग हें धरिलें असे
६ ह्या दोहींपासुनी भूतें सगळीं जाण निर्मिलीं
साऱ्या जगास तद्-द्वारा मूळ मी आणि शेवट
७ दुसरें तत्त्व नाहीं चि कांहीं माझ्या पलीकडे
ओंविलें सर्व माझ्यांत जसे धाग्यामधें मणि ।

८ पाण्यांत रस मी झालों चंद्र-सूर्यीं प्रकाश मी
ॐ वेदीं शब्द आकाशीं पुरुषीं पुरुषार्थ मी
९ मी पुण्य-गंध पृथ्वींत असें अग्नींत उष्णता
प्राणि-मात्रांत आयुष्य तपो-वृद्धांत मी तप
१० सर्व भूतांत जें बीज तें मी जाण सनातन
बुद्धिमंतांत मी बुद्धि तेजस्व्यांत हि तेज मी
११ वैराग्य-युक्त निष्काम बळवंतांत मी बळ
राहे धरूनि धर्मास ती मी भूतांत वासना
१२ माझ्यांतूनि तिन्ही झाले सात्त्विकादिक भाव ते
परी त्यांत न मी राहें ते चि माझ्यांत राहती ॥

[२२]

१३ ह्या गुणात्मक भावांनीं विश्व मोहूनि टाकिलें
ज्यामुळें मी न जाणूं यें गुणातीत सनातन
१४ माझी ही त्रिगुणी दैवी माया न तरवे कुणा
कासेस लागले माझ्या ते चि जाती तरूनियां
१५ हीन मूढ दुराचारी माझा आश्रय सोडिती
मायेनें भ्रांत होऊनि आसुरी भाव जोडिती ।

१६ भक्त चौघे सदाचारी भजती मज अर्जुना
ज्ञानी तसे चि जिज्ञासु हितार्थी आणि विह्वल
१७ ज्ञानी वरिष्ठ सर्वांत नित्य-युक्त अनन्य जो
अत्यंत गोड मी त्यास तो हि गोड तसा मज
१८ उदार हे जरी सारे ज्ञानी तो मी चि कीं स्वयें
जोडला स्थिर माझ्यांत गति अंतिम पाहुनी
१९ अनेक जन्म घेऊनि पावला शरणागति
विश्व देखे वासुदेव संत तो बहु दुर्लभ ॥

२० भ्रमले कामना-ग्रस्त धुंडिती अन्य दैवतें
स्वभाव-वश होऊनि तो तो नियम पाळिती
२१ श्रद्धेनें ज्या स्वरूपास जे भजूं इच्छिती जसे
त्यांची ती चि तशी श्रद्धा स्थिर मी करितों स्वयें
२२ त्या श्रद्धेच्या बळानें ते त्या स्वरूपास पूजिती
मग मागितले भोग पावती मीं चि निर्मिले
२३ अल्प बुद्धीमुळें त्यांस मिळे फळ अशाश्वत
देवांचे भक्त देवांस माझे ते मज पावती ।

२४ व्यक्त मी हें चि ते घेती बुद्धि-हीन न जाणुनी
अव्यक्त थोर जें रूप माझें अंतिम शाश्वत
२५ वेढिलों योग-मायेनें अंधार चि जगास मी
अजन्मा नित्य मी कैसा मूढ कोणी न ओळखे
२६ झालीं जीं जीं हि होतील भूतें आहेत आज जीं
सगळीं जाणतों तीं मी मज कोणी न जाणती॥

[२३]

२७ राग-द्वेषांमुळें चित्तीं जडला द्वंद्व-मोह जो
संसारीं सगळीं भूतें त्यानें मोहूनि टाकिलीं
२८ ज्यांनीं झिजविलें पाप पुण्य-कर्म करूनियां
ते द्वंद्व-मोह तोडूनि भजती मज निश्चयें
२९ झटती आश्रयें माझ्या जरा-मृत्यु गिळावया
ते ब्रह्म जाणती पूर्ण तसें अध्यात्म कर्म हि
३० अधिभूताधिदैवांत अधियज्ञांत जे मज
देखती ते प्रयाणीं हि जाणती मज सावध॥

# अध्याय आठवा

## [२४]

अर्जुन म्हणाला

१ ब्रह्म तें बोलिलें काय काय अध्यात्म कर्म तें
अधि-भूत कसें सांग अधि-दैव हि तें तसें
२ अधि-यज्ञ कसा कोण ह्या देहीं बोलिला असे
प्रयाणीं हि कसे योगी निग्रही तुज जाणती।

श्रीभगवान् म्हणाले

३ ब्रह्म अक्षर तें थोर अध्यात्म निज-भाव जो
भूत-सृष्टि घडे सारी तो जो व्यापार कर्म तें
४ अधि-भूत विनाशी जें जीवत्व अधि-दैवत
अधि-यज्ञ असें मी चि ह्या देहीं यज्ञ-पूत जो।

५ अंत-कालीं हि माझें चि चित्तीं स्मरण राखुनी
देह सोडूनि गेला तो मिळे मज न संशय
६ जो जो आठवुनी भाव शेंवटीं देह सोडितो
मिळे त्या त्या चि भावास सदा त्यांत चि रंगला
७ म्हणूनि सगळा काळ मज आठव झुंज तूं
मन बुद्धि समर्पूनि मज निःशंक पावसी ॥

८ अभ्यासीं चित्त जोडूनि योगी अन्य न लक्षुनी
पुरुषास महा दिव्य पावे संतत चिंतुनी
९ सर्वज्ञ कर्ता गुरु जो पुराण
सूक्ष्माहुनी सूक्ष्म अचिंत्य-रूप
गिळूनि अंधार उजेडला जो
तो चिंतुनीयां प्रभु सूर्य-वर्ण
१० प्रयाण-कालीं स्थिर चित्त राखे
प्रेमें तसा योग-बळें करूनि
भ्रू-संगमीं प्राण जडूनि ठेवी
तेव्हां मिळे त्या पुरुषास दिव्य ।

११ जें घोकिती अक्षर वेद-वेत्ते
विरक्त यत्नें मिळती जयास
जें ब्रह्मचर्यें पद इच्छिताती
तें सांगतों मी तुज तत्त्व-सार

१२ लावूनि सगळीं द्वारें कोंडूनि मन अंतरीं
मस्तकीं प्राण राखूनि चढला धारणेवरी

१३ मुखें ॐ-ब्रह्म उच्चारी अंतरीं मज आठवी
ह्यापरी देह ठेवूनि जाय थोर गतीस तो।

१४ अनन्य-चित्त जो नित्य स्मरे मज निरंतर
सदा मिसळला योगी तो सुखें मज पावतो

१५ पावले मोक्ष-सिद्धीस महात्मे मज भेटुनी
दुःखाचें घर तो जन्म न घेती चि अशाश्वत ॥

[२५]

१६ ब्रह्मादि लोक ते सारे माघारे घालिती पुन्हां
माझी भेट घडे तेव्हां जन्मणें मग खुंटलें।
१७ होतसे ब्रह्म-देवाचा सहस्र-युग तों दिन
तेवढी चि तशी रात्र कालोपासक जाणती
१८ अव्यक्तापासुनी होती भूतें व्यक्त दिनोदयीं
रात्र होतां लया जाती सगळीं मग त्यांत चि
१९ तीं चि तीं चि पुन्हां भूतें त्यांचें कांहीं न चालतां
दिनांतीं मरती सारीं उदयीं जन्म पावती।
२० अव्यक्त दुसरें तत्त्व त्या अव्यक्तापलीकडे
नाशतां सगळीं भूतें न नाशे जें सनातन
२१ त्यास अक्षर हें नाम ती चि शेंवटची गति
माझें परम तें धाम जेथूनि परते चि ना
२२ लाभे अनन्य-भक्तीनें पार्था पुरुष थोर तो
ज्यांत हीं राहती भूतें ज्यानें विस्तारलें जग॥

[२६]

२३ कोण्या काळीं कसा देह ठेवुनी येथ साधक
संसारीं पडतो किंवा पावतो सिद्धि ऐक तें
२४ अग्नीनें दिन शुक्लार्ध उत्तरायण जोडुनी
जाय तो गांठतो ब्रह्म शेंवटीं ब्रह्म जाणुनी
२५ धूमानें रात्र कृष्णार्ध दक्षिणायन जोडुनी
जाय तो परते येथ चंद्र-लोकास पावुनी ।
२६ उजेड आणि अंधार दोन्ही मार्ग अनादि हे
सुटका करितो एक एक फेऱ्यांत टाकितो
२७ असे हे मार्ग जाणूनि योगी मोह न पावतो
म्हणूनि सर्वदा राहें योगानें जोडिला चि तूं
२८ यज्ञांत दानांत तपांत तैसें
जें बोलिलें अध्ययनांत पुण्य
तें लंघितो सर्व चि जाणुनी हें
योगी चढे आद्य पदास थोर ॥

# अध्याय नववा

[२७]

श्रीभगवान् म्हणाले

१ आतां गुपित हें थोर सांगतों निर्मळा तुज
विज्ञानें कसिलें ज्ञान अशुभांतूनि सोडवी
२ राज-विद्या महा-गुह्य उत्तमोत्तम पावन
प्रत्यक्ष हें सुखें लाभे धर्म-सार सनातन
३ लोक नास्तिक हा धर्म अश्रद्धेनें न सेविती
मृत्यूची धरिती वाट संसारीं मज सोडुनी ॥

४ मीं चि अव्यक्त-रूपानें जग हें व्यापिलें असे
माझ्यांत राहती भूतें मी न भूतांत राहतों
५ न वा भूतें हि माझ्यांत माझा हा दिव्य योग कीं
करितों धरितों भूतें परी त्यांत नसें कुठें
६ आकाशांत महा-वायु सदा सर्वत्र राहतो
माझ्यांत सगळीं भूतें राहती जाण तूं तशीं ।

७ कल्पांतीं निजवीं भूतें मी माझ्या प्रकृतीमधें
कल्पारंभीं पुन्हां सारीं मी चि जागवितों स्वयें

८ हातीं प्रकृति घेऊनि जागवीं मी पुन्हां पुन्हां
भूतांचा संघ हा सारा प्रकृतीच्या अधीन जो

९ परी हीं सगळीं कर्में बांधूं न शकती मज
उदासीनापरी राहें अनासक्त म्हणूनियां

१० साक्षी मी प्रकृति-द्वारा उभारीं सचराचर
त्यामुळें सर्व सृष्टीची ही घडामोड होतसे ॥

[२८]

११ मज मानव-रूपांत तुच्छत्वें मूढ देखती
नेणूनि थोरलें रूप जें माझें विश्व-चालक

१२ ते आशा-वाद मूढांचे कर्में ज्ञानें हि तीं वृथा
संपत्ति जोडिली ज्यांनीं आसुरी मोह-कारक।

१३ दैवी संपत्ति जोडूनि महात्मे भजती मज
अनन्य-भावें जाणूनि मी विश्वारंभ शाश्वत

१४ अखंड कीर्तनें माझ्या यत्न-शील दृढ-व्रती
भक्तीनें मज वंदूनि भजती नित्य जोडिले
१५ दुसरे ज्ञान-यज्ञानें भजती व्यापका मज
ब्रह्म-भावें विवेकानें अविरोधें चि देखुनी ॥

१६ मी चि संकल्प मी यज्ञ स्वावलंबन अन्न मी
मंत्र मी हव्य तें मी चि अग्नि मी मी चि अर्पण
१७ मी ह्या जगास आधार माय बाप वडील मी
मी तिन्ही वेद ॐकार जाणण्या योग्य पावन
१८ साक्षी स्वामी सखा भर्ता निवास गाति आसरा
करीं हरीं धरीं मी चि ठेवा मी बीज अक्षय
१९ तापतों सूर्य-रूपें मी सोडितों वृष्टि खेंचितों
मृत्यु मी आणि मी मोक्ष असें आणि नसें हि मी॥

[२९]

२० वेदाभ्यासी सोम-पानें पुनीत
माझ्या यज्ञें इच्छिती स्वर्ग जोडूं
ते पुण्यानें जाउनी इंद्र-लोकीं
तेथींचे ते भोगिती दिव्य भोग

२१ त्या स्वर्गातें भोगुनी ते विशाळ
क्षीणें पुण्यें मृत्यु-लोकास येती
ऐसे निष्ठा ठेवुनी वेद-धर्मीं
येणें-जाणें जोडिती काम-मूढ।

२२ अनन्य-भावें चिंतूनि भजती भक्त जे मज
सदा मिसळले त्यांचा मी योग-क्षेम चालवीं।

२३ श्रद्धा-पूर्वक जे कोणी यजिती अन्य दैवतें
यजिती ते हि मातें चि परी मार्गास सोडुनी

२४ भोक्ता मी सर्व यज्ञांचा फल-दाता हि मी चि तो
नेणती तत्त्व हें माझें म्हणूनि पडती चि ते

२५ देवांचे भक्त देवांस पितरांचे तयांस चि
भूतांचे भक्त भूतांस माझे हि मज पावती॥

[ ३० ]

२६ पत्र वा पुष्प जो प्रेमें फळ वा जळ दे मज
तें त्या पवित्र भक्ताचें अर्पिलें खाय मी सुखें

२७ जें खासी होमिसी देसी जें जें आचरिसी तप
जें कांहीं करिसी कर्म तें करीं मज अर्पण

१०२५०५
३/०८
९३९२
३०/१२/४

२८ अशानें तोडुनी सर्व कर्म-बंध शुभाशुभ
योग-संन्यास सांधूनि मिळसी मज मोकळा ॥

२९ सम मी सर्व भूतांस प्रियाप्रिय नसे मज
परी प्रेम-बळें राहे भक्त माझ्यांत त्यांत मी ।
३० असो मोठा दुराचारी भजे मज अनन्य जो
मानावा तो जसा साधु त्याचा सुंदर निश्चय
३१ शीघ्र तो होय धर्मात्मा शांति शाश्वत मेळवी
जाण निश्चित तूं माझा भक्त नाश न पावतो ।
३२ धरूनि आसरा माझा भोळे स्त्री-वैश्य-शूद्र हि
कीं पाप-योनि जे जीव ते हि मोक्षास पावती
३३ तेथें ब्रह्मर्षि राजर्षि ह्यांची गोष्ट कशास ती
भज तूं मज आलास लोकीं दुःख-द नश्वर ।
३४ प्रेमानें ध्यास घेऊनि यजीं मज नमीं मज
असें जोडूनि आत्म्यास मिळसी मज मत्पर ॥

# अध्याय दहावा

## [ ३१ ]

श्रीभगवान् म्हणाले

१ फिरूनि सांगतों ऐक वाक्य उत्तम मी तुज
राखसी श्रवणीं गोडी तुझें मी हित इच्छितों

२ न देव जाणती माझा प्रभाव न महर्षि हि
सर्वथा मी चि देवांचें महर्षींचें हि मूळ कीं

३ ओळखे जो अ-जन्मा मी स्वयं-भू विश्व-चालक
निर्मोह तो मनुष्यांत सुटला पातकांतुनी ।

४ बुद्धि निर्मोहता ज्ञान सत्यता शम निग्रह
जन्म नाश सुखें दुःखें लाभालाभ भयाभय

५ तप दातृत्व संतोष अहिंसा समता क्षमा
माझ्या चि पासुनी भूतीं भाव हे वेगवेगळे

६ महर्षि सात पूर्वींचे चौघे मनु तसे चि ते
माझे संकल्पिले भाव ज्यांची लोकांत ही प्रजा

७ हा योग-युक्त विस्तार माझा जो नीट ओळखे
त्यास निष्कंप तो योग लाभे ह्यांत न संशय ॥

८ सर्वांचें मूळ माझ्यांत प्रेरणा मजपासुनी
हें ओळखूनि भक्तीनें जाणते भजती मज

९ चित्तें प्राणें जसे मी चि एकमेकांस बोधिती
भरूनि कीर्तनें माझ्या ते आनंदांत खेळती

१० असे जे रंगले नित्य भजती प्रीति-पूर्वक
त्यांस मी भेटवीं मातें देउनी बुद्धि-योग तो

११ करूनि करुणा त्यांची हृदयीं राहुनी स्वयें
तेजस्वी ज्ञान-दीपानें अज्ञान-तम घालवीं ॥

## [ ३२ ]

अर्जुन म्हणाला

१२ पवित्र तूं पर-ब्रह्म थोर तें मोक्ष-धाम तूं
आत्मा नित्य अ-जन्मा तूं विभु देवादि दिव्य तूं
१३ ऋषि एक-मुखें गाती तसे असित देवल
व्यास नारद देवर्षि तूं हि आपण सांगसी
१४ मानितों सत्य हें सारें स्वयें जें सांगसी मज
देव दानव कोणी हि तुझें रूप न जाणती
१५ जाणसी तें तुझें तूं चि प्रत्यक्ष पुरुषोत्तमा
देव-देवा जगन्नाथा भूतेशा भूत-भावना ।
१६ विभूति आपुल्या दिव्य मज निःशेष सांग तूं
ज्यांनीं हें विश्व तूं सारें राहिलास भरूनियां
१७ योगेश्वरा कसें जाणूं चिंतनीं चिंतनीं तुज
कोणत्या कोणत्या स्वरूपांत करावें ध्यान मीं तुझें
१८ त्या विभूति तसा योग आपुला तो सविस्तर
पुन्हां सांग नव्हे तृप्ति सेवितां वचनामृत ॥

श्रीभगवान् म्हणाले

१९ बरें मी सांगतों दिव्य मुख्य मुख्य चि त्या तुज
माझा विभूति-विस्तार न संपे चि कुठें कधीं
२० राहतों आत्म-रूपानें सर्वांच्या हृदयांत मी
भूत-मात्रास मी मूळ मध्य मी मी चि शेंवट।
२१ आदित्यांत महा-विष्णु ज्योतिष्मंतांत सूर्य मी
मरीचि मुख्य वायूंत मी नक्षत्रांत चंद्रमा
२२ मी साम-वेद वेदांत असें देवांत इंद्र मी
चेतना मी चि भूतांत मन तें इंद्रियांत मी
२३ कुबेर यक्ष-रक्षांत मी रुद्रांत सदाशिव
वसूंत मी असें अग्नि असें उंचांत मेरु मी
२४ पुरोहितांत तूं जाण मुख्य तो मी बृहस्पति
सेनानींत तसा स्कंद जल-राशींत सागर
२५ मी एकाक्षर वाणींत महर्षींत असें भृगु
जप मी सर्व यज्ञांत मी स्थिरांत हिमालय
२६ सर्व वृक्षांत अश्वत्थ मी देवर्षींत नारद
मी चित्ररथ गंधर्वीं सिद्धीं कपिल मी मुनि

२७ अश्वीं उच्चैःश्रवा जो मी निघालों अमृतांतुनी
ऐरावत गजेंद्रांत मी नरांत नराधिप

२८ मी काम-धेनु गाईंत आयुधीं वज्र मी असें
उत्पत्ति-हेतु मी काम मी सर्पोत्तम वासुकि

२९ नागांत शेष मी थोर जळीं वरुण-देवता
पितरीं अर्यमा तो मी ओढणारांत मी यम

३० असें दैत्यांत प्रह्लाद मोजणारांत काळ मी
श्वापदांत असें सिंह पक्ष्यांत खग-राज मी

३१ वेगवंतांत मी वायु शस्त्र-वीरांत राम मी
मत्स्यांत मी असें नक्र नदी गंगा नद्यांत मी।

३२ सृष्टीचें मी असें मूळ मुख मी ओघ तो हि मी
विद्यांत आत्म-विद्या मी वक्त्यांचा तत्त्व-वाद मी

३३ समासांत असें द्वंद्व अक्षरांत अकार मी
मी चि अक्षय तो काळ विश्व-कर्ता विराट् स्वयें

३४ सर्व-नाशक मी मृत्यु होणारा जन्म मी असें
वाणी श्री कीर्ति नारींत क्षमा मेधा धृति स्मृति

३५ सामांत मी बृहत्-साम गायत्री मंत्र-सार मी
मी मार्गशीर्ष मासांत ऋतूंत फुलला ऋतु

३६ द्यूत मी छळणारांचें तेजस्व्यांतील तेज मी
सत्त्व मी सात्त्विकांतील जय मी आणि निश्चय

३७ मी वासुदेव वृष्णींत पांडवांत धनंजय
मुनींत मुनि मी व्यास कवींत उशना कवि

३८ दंड मी दमवंतांचा विजयेच्छूंस धर्म मी
गूढांत मौन मी थोर ज्ञात्यांचें ज्ञान मी असें ।

३९ तसें चि सर्व भूतांचें बीज जें तें हि जाण मी
माझ्या विण नसे कांहीं लेश-मात्र चराचरीं

४० माझ्या दिव्य विभूतींस नसे अंत कुठें चि तो
तरी विभूति-विस्तार हा मी थोड्यांत बोलिलों

४१ विभूति-युक्त जी वस्तु लक्ष्मीवंत उदात्त वा
माझ्या चि किरणांतूनि निघाली जाण ती असे

४२ अथवा काय् हें फार जाणूनि करिशील तूं
एकांशें विश्व हें सारें व्यापूनि उरलों चि मी ॥

# अध्याय अकरावा

## [ ३३ ]

अर्जुन म्हणाला

१ करूनि करुणा माझी बोलिलास रहस्य जें
त्या थोर आत्म-विद्येनें माझा हा मोह फेडिला
२ उत्पत्ति-नाश भूतांचे ऐकिले मीं सविस्तर
कळला तुजपासूनि अभंग महिमा तुझा ।
३ तुझें तें ईश्वरी रूप मानितों सांगसी जसें
तें चि मी इच्छितों पाहूं प्रत्यक्ष पुरुषोत्तमा
४ तूं जरी मानिसी शक्य मज तें रूप पाहणें
तरी योगेश्वरा देवा दाखवीं तें चि शाश्वत ॥

श्रीभगवान् म्हणाले

५ पहा दिव्य तशीं माझीं रूपें शत-सहस्र तूं
नाना प्रकार आकार वर्ण ज्यांत विचित्र चि
६ वसु वायु पहा रुद्र तसे आदित्य अश्विनी
पहा अनेक आश्चर्यें कधीं कोणीं न पाहिलीं

७ इथें आज पहा सारें विश्व तूं सचराचर
माझ्या देहांत एकत्र इच्छा-दर्शन हें तुज ।
८ परी तूं चर्म-चक्षूनें पाहूं न शकसी मज
घे दिव्य दृष्टि ही माझा ईश्वरी योग तूं पहा ।।

संजय म्हणाला

९ महा-योगेश्वरें कृष्णें राया बोलूनि ह्यापरी
दाविलें तेथ पार्थास थोरलें रूप ईश्वरी ।
१० बहु डोळे मुखें ज्यांत दर्शनें बहु अद्भुत
बहु दिव्य अलंकार सज्ज दिव्यायुधें बहु
११ दिव्य वस्त्रें फुलें गंध लेउनी सर्वतोपरी
आश्चर्यें भरला देव विश्व-व्यापी अनंत तो
१२ प्रभा सहस्र-सूर्यांची नभीं एकवटे जरी
तरी त्या थोर देवाच्या प्रभेशीं न तुळे चि ती
१३ सारे जगांतले भेद तेव्हां कालवले जसे
देहांत देव-देवाच्या देखिले तेथ अर्जुनें ।
१४ मग विस्मित तो झाला अंगीं रोमांच दाटले
प्रभूस हात जोडूनि बोलिला नत-मस्तक ।।

[ ३४ ]

अर्जुन म्हणाला

१५ देखें प्रभो देव तुझ्या शरीरीं
कोंदाटले सर्व चि भूत-संघ
पद्मासनीं ध्यान धरी विधाता
ऋषींसवें खेळत दिव्य सर्प

१६ लेऊनि डोळे मुख हात पोट
जिथें तिथें तूं चि अनंत-मूर्ते
विश्वेश्वरा शेंवट मध्य मूळ
तुझ्या न मी देखत विश्व-रूपीं

१७ प्रभो गदा-चक्र-किरीट-धारी
प्रकाश सर्वत्र तुझा प्रचंड
डोळे न पाहूं शकती अपार
ज्यांतूनि हे पेटत अग्नि-सूर्य।

१८ तूं थोर तें अक्षर जाणण्याचें
तुझा चि आधार जगास अंतीं
तूं राखिसी शाश्वत-धर्म नित्य
मी मानितों तूं परमात्म-तत्त्व।

१९ किती भुजा वीर्य किती पसारा
डोळे कसे उज्ज्वल चंद्र-सूर्य
हा पेटला अग्नि तुझ्या मुखांत
तूं ताविसी सर्व चि आत्म-तेजें।

२० दाही दिशा विस्तृत अंतराळ
व्यापूनि तूं एक चि राहिलासी
पाहूनि हें अद्‌भुत उग्र रूप
तिन्ही जगें व्याकुळलीं उदारा

२१ हे देव सारे रिघती तुझ्यांत
कोणी भयें प्रार्थित बद्ध-हस्त
मांगल्य-गीतें तुज सिद्ध संत
परोपरी आळविती समस्त

२२ आदित्य विश्वे वसु रुद्र साध्य
कुमार दोघे पितृ-देव वायु
गंधर्व दैत्यांसह यक्ष सिद्ध
सारे कसे विस्मित पाहताती ।

२३ अफाट हें रूप असंख्य डोळे
मुखें भुजा ऊरु असंख्य पाय
असंख्य पोटें विकराळ दाढा
ह्या दर्शनें व्याकुळ लोक मी हि

२४ भेदूनि आकाश भरूनि रंगीं
फाडूनि डोळे उघडूनि तोंडें
तूं पेटलासी बघ जीव माझा
भ्याला न देखे शम आणि धीर

२५ कराळ दाढा विकराळ तोंडें
कल्पान्त-अग्नीसम देखतां चि
दिङ्-मूढ झालों सुख तें पळालें
प्रसन्न हो कीं जग हें तुझें चि ।

२६ अहा कसे हे धृतराष्ट्र-पुत्र
घेऊनियां राज-समूह सारे
हे भीष्म हे द्रोण तसा चि कर्ण
हे आमुचे वीर हि मुख्य मुख्य

२७ जाती त्वरेनें चि तुझ्या मुखांत
भयाण जीं भ्यासुर ज्यांत दाढा
दांतांत कांहीं शिरलीं शिरें जीं
त्यांचें जसें पीठ चि पाहतों मी

२८ जसे नद्यांचे सगळे प्रवाह
वेगें समुद्रांत चि धांव घेती
तसे तुझ्या हे जळत्या मुखांत
धांवूनि जांती नर-वीर सारे

२९ भरूनियां वेग जसे पतंग
घेती उड्या अग्नि-मुखीं मराया
तसे चि हे लोक तुझ्या मुखांत
घेती उड्या वेग-भरें मराया

३० समस्त लोकांस गिळूनि ओंठ
तूं चाटितोसी जळत्या जिभांनीं
वेढूनि विश्वास समग्र तेजें
भाजे प्रभो उग्र तुझी प्रभा ही।

३१ सांगा असां कोण तुम्ही भयाण
नमूं तुम्हां देव-वरा न कोपा
जाणावया उत्सुक आदि-देवा
ध्यानीं न ये कीं करणी कशी ही ॥

श्रीभगवान् म्हणाले

३२ मी काळ लोकांतक वाढलेला
भक्षावया सिद्ध इथें जनांस
हे नष्ट होतील तुझ्या विना हि
झाले उभे जे उभयत्र वीर

३३ म्हणूनि तूं ऊठ मिळीव कीर्ति
जिंकूनि निष्कंटक राज्य भोगीं
मीं मारिले हे सगळे चि आधीं
निमित्त हो केवळ सव्य-साची

३४ द्रोणास भीष्मास जयद्रथास
कर्णादि वीरांस रणांगणांत
मीं मारिलेल्यांस फिरूनि मारीं
निःशंक झुंजें जय तो तुझा चि ॥

[.३५]

संजय म्हणाला

३५ ऐकूनि हें अर्जुन कृष्ण-वाक्य
भ्याला जसा कांपत हात जोडी
कृष्णास वंदूनि पुनश्च बोले
लवूनिया तेथ गळा भरूनि।

अर्जुन म्हणाला

३६ जगीं तुझ्या युक्त चि कीर्तनानें
आनंद लोटे अनुराग दाटे
भ्याले कसे राक्षस धांव घेती
हे वंदिती सिद्ध-समूह सारे
३७ प्रभो न कां हे तुज वंदितील
कर्त्यास कर्ता गुरु तूं गुरूस
आधार तूं अक्षर तूं अनंता
आहेस नाहींस पलीकडे तूं
३८ देवादि तूं तूं चि पुराण आत्मा
जगास ह्या अंतिम आसरा तूं
तूं जाणतोसी तुज मोक्ष-धामा
विस्तारिसी विश्व अनंत-रूपा

३९ तूं अग्नि तूं वायु समस्त देव
प्रजापते तूं चि पिता वडील
असो नमस्कार सहस्र वार
पुन्हां पुन्हां आणि पुन्हां पुन्हां हि

४० समोर मागें सगळीकडे चि
असो नमस्कार जिथें जिथें तूं
उत्साह सामर्थ्य तुझें अनंत
तूं सर्व कीं सर्व तुझ्या चि पोटीं।

४१ समान मानीं अविनीत-भावें
कृष्णा गड्या हांक अशी चि मारीं
न जाणता हा महिमा तुझा मी
प्रेमें प्रमादें बहु बोल बोलें

४२ खेळें निजें स्वैर चि खात बैसें
चेष्टा करीं सर्व तुझ्या समोर
जनीं मनीं वा तुज तुच्छ लेखें
क्षमा करीं भान तुझें कुणास

४३ आहेस तूं बाप चराचरास
आहेस मोठी गुरु-देवता तूं
तुझी न जोडी तुज कोण मोडी
तिन्ही जगीं ह्या उपमा चि थोडी

४४ म्हणूनि लोटांगण घालितों मी
प्रसन्न होईं स्तवनीय-मूर्ते
क्षमा करीं बा मज लेंकरातें
सखा सख्यातें प्रिय तूं प्रियातें ।

४५ अपूर्व पाहूनि अपार धालों
परी मनीं व्याकुळता न जाय
पुन्हां बघूं दे मज तें चि रूप
प्रसन्न होईं जगदीश्वरा तूं

४६ घेईं गदा चक्र किरीट घालीं
तसें चि पाहूं तुज इच्छितों मी
अनंत बाहूंस गिळूनि पोटीं
चहूं भुजांचा नट विश्व-मूर्ते ॥

[३६]

श्रीभगवान् म्हणाले

४७ प्रसन्न होऊनि रचूनि योग
हें दाविलें मीं तुज विश्व-रूप
अनंत तेजोमय आद्य थोर
जें पाहिलें आजवरी न कोणीं
४८ घोकूनियां वेद करूनि कर्मे
यजूनि वा उग्र तपें तपूनि
देऊनि दानें जगतीं न शक्य
तुझ्या विना दर्शन हें कुणास
४९ होऊं नको व्याकुळ मूढ-भावें
पाहूनि हें रूप भयाण माझें
प्रसन्न-चित्तें भय सोडुनी तूं
पहा पुन्हां तें प्रिय पूर्व-रूप।

संजय म्हणाला

५० बोलूनि ऐसें मग वासुदेवें
पार्थास तें दाखविलें स्वरूप
भ्याल्यास आश्वासन द्यावया तो
झाला पुन्हां सौम्य उदार देव॥

अर्जुन म्हणाला

५१ पाहूनि हें तुझें सौम्य मानुषी रूप माधवा
झालों प्रसन्न मी आतां आलों भानावरी पुन्हां ।

श्रीभगवान् म्हणाले

५२ हें पाहिलेंस तूं माझें अति दुर्लभ दर्शन
आशा चि राखुनी ज्याची झुरती नित्य देव हि

५३ यज्ञ-दान-तपें केलीं वेदाभ्यास हि साधिला
तरी दर्शन हें माझें न लाभे लाभलें तुज

५४ लाभे अनन्य-भक्तीनें माझें हें ज्ञान-दर्शन
दर्शनें होय माझ्यांत प्रवेश मग तत्त्वतां ॥

५५ माझ्या कर्मांत जो मग्न भक्तीनें भरला असे
जगीं निःसंग निर्वैर मिळे तो मज मत्पर ॥

# अध्याय बारावा

## [ ३७ ]

अर्जुन म्हणाला

१ असे मिसळले कोणी तुज भक्त उपासिती
कोणी अक्षर अव्यक्त योगी ते थोर कोणते ।

श्रीभगवान् म्हणाले

२ रोवूनि मन माझ्यांत भजती नित्य जोडिले
श्रद्धेनें भारले माझ्या ते योगी थोर मानितों ।

३ परी अचिंत्य अव्यक्त सर्व-व्यापी खुणेविण
नित्य निश्चळ निर्लिप्त जे अक्षर उपासिती

४ रोधिती इंद्रियें पूर्ण सर्वत्र सम जाणुनी
माझ्या कडे चि ते येती ज्ञानी विश्व-हितीं रत

५ अव्यक्तीं गोविती चित्त क्लेश त्यांस विशेष चि
देहवंतास अव्यक्तीं सुखें बोध घडे चि ना ।

६ परी जे सगळीं कर्में मज अर्पूनि मत्पर
अनन्य भक्ति-योगानें भजती चिंतुनी मज

७ माझ्यांत रोविती चित्त त्यांस शीघ्र चि मी स्वयें
संसार-सागरांतूनि काढितों मृत्यु मारुनी ॥

[ ३८ ]

८ मन माझ्यांत तूं ठेव बुद्धि माझ्यांत राख तूं
म्हणजे मग निःशंक मी चि होशील तूं स्वयें

९ जाईल जड माझ्यांत चित्तास करणें स्थिर
तरी अभ्यास-योगानें इच्छूनि मज मेळवीं

१० अभ्यास हि नव्हे साध्य तरी मत्कर्म आचरीं
मिळेल तुज ती सिद्धि मत्कर्म हि करूनियां

११ न घडे हें असें कर्म योग माझ्यांत साधुनी
तरी सर्व चि कर्मांचें प्रयत्नें फळ सोड तूं

१२ प्रयत्नें लाभतें ज्ञान पुढें तन्मयता घडे
मग पूर्ण फल-त्याग शीघ्र जो शांति देतसे ॥

[ ३९ ]

१३ कोणाचा न करी द्वेष दया मैत्री वसे मनीं
मीं माझें न म्हणे सोशी सुख-दुःखें क्षमा-बळें
१४ सदा संतुष्ट जो योगी संयमी दृढ-निश्चयी
अर्पी मज मनो-बुद्धि भक्त तो आवडे मज।
१५ जो न लोकांस कंटाळे ज्यास कंटाळती न ते
हर्ष शोक भय क्रोध नेणे तो आवडे मज
१६ नेणे व्यथा उदासीन दक्ष निर्मळ निःस्पृह
सोडी आरंभ जो सारे भक्त तो आवडे मज
१७ न उल्लासे न संतापे न मागे न झुरे चि जो
बरें वाईट सोडूनि भजे तो आवडे मज
१८ सम देखे सखे वैरी तसे मानापमान हि
शीत उष्ण सुखें दुःखें करूनि सम मोकळा
१९ निंदा स्तुति न घे मौनी मिळे तें गोड मानितो
स्थिर-बुद्धि निराधार भक्त तो आवडे मज।
२० जे धर्म-सार हें नित्य श्रद्धेनें मी चि लक्षुनी
सेविती ते तसे भक्त फार आवडती मज ॥

# अध्याय तेरावा

१२२७५
क्रं. ३१०५
९३७२
नों. दि ३०।१२।४५
वाचनालय

## [४०]

श्रीभगवान् म्हणाले

१ अर्जुना ह्या शरीरास म्हणती क्षेत्र जाणते
जाणे हें क्षेत्र जो त्यास क्षेत्र-ज्ञ म्हणती तसें
२ क्षेत्र-ज्ञ मी चि तो जाण क्षेत्रांत सगळ्या वसें
क्षेत्र-क्षेत्रज्ञ-भेदास जाणणें ज्ञान मी म्हणें ॥

३ क्षेत्र कोण कसें त्यांत विकार कुठले कसे
क्षेत्र-ज्ञ तो कसा कोण ऐक थोड्यांत सांगतों
४ ऋषींनीं भिन्न मंत्रांत गाइलें हें परोपरी
वर्णिलें ब्रह्म-वाक्यांत सप्रमाण सुनिश्चित ।
५ पंच भूतें अहंकार बुद्धि अव्यक्त मूळ जें
इंद्रियें अकरा त्यांस खेंचितें अर्थ-पंचक
६ इच्छा द्वेष सुखें दुःखें धृति संघात चेतना
विकार-युक्त हें क्षेत्र थोड्यांत तुज बोलिलों ।

७ नम्रता दंभ-शून्यत्व अहिंसा ऋजुता क्षमा
पावित्र्य गुरु-शुश्रूषा स्थिरता आत्म-संयम
८ निरहंकारता चित्तीं विषयांत विरक्तता
जन्म-मृत्यु-जरा-रोग-दुःख-दोष-विचारणा
९ निःसंग-वृत्ति कर्मांत पुत्रादींत अलिप्तता
प्रिय-अप्रिय लाभांत अखंड सम-चित्तता
१० माझ्या ठाईं अनन्यत्वें भक्ति निष्काम निश्चळ
एकांताविषयीं प्रीति जन-संगांत नावड
११ आत्म-ज्ञानीं स्थिर श्रद्धा तत्त्वतां ज्ञेय-दर्शन
हें ज्ञान बोलिलें सारें अज्ञान विपरीत जें ।

१२ ज्ञेय तें सांगतों ज्याच्या ज्ञानानें अमृतत्व चि
अनादि जें पर-ब्रह्म आहे नाहीं न बोलवे
१३ सर्वत्र दिसती ज्यास हात पाय शिरें मुखें
कान डोळे हि सर्वत्र सर्व झांकूनि जें उरे
१४ असूनि इंद्रियातीत त्यांचे व्यापार भासवी
न स्पर्शतां धरी सर्व गुण भोगूनि निर्गुण

१५ जें एक आंत-बाहेर जें एक चि चराचर
असूनि जवळीं दूर सूक्ष्मत्वें नेणवे चि जें

१६ भूत-मात्रीं न भेदूनि राहिलें भेदिल्यापरी
भूतांस जन्म दे पाळी गिळी जें शेंवटीं स्वयें

१७ जें अंधारास अंधार तेजाचें तेज बोलिलें
ज्ञानाचें ज्ञान तें ज्ञेय सर्वांच्या हृदयीं वसे ।

१८ संक्षेपें वर्णिलें क्षेत्र ज्ञान ज्ञेय तसें चि हें
जाणूनि भक्त जें माझा माझें सायुज्य मेळवी ॥

[४१]

१९ प्रकृती-पुरुषाची ही जोडी जाण अनादि तूं
प्रकृतीपासुनी होती विकार गुण सर्व हि

२० देहेंद्रियांचें कर्तृत्व बोलिलें प्रकृतीकडे
दुःखा-सुखाचें भोक्तृत्व बोलिलें पुरुषाकडे

२१ बांधिला प्रकृतीनें तो तिचे ते गुण भोगितो
गुण-संगामुळें ह्यास घेणें जन्म शुभाशुभ ।

२२ सर्व-साक्षी अनु-ज्ञाता भर्ता भोक्ता महेश्वर
म्हणती परमात्मा हि देहीं पुरुष तो पर

२३ पुरुषाचें असें रूप प्रकृतीचें गुणात्मक
जाणे कसा हि तो राहो न पुन्हां जन्म पावतो ।

२४ ध्यानानें पाहती कोणी स्वयें आत्म्यास अंतरीं
सांख्य-योगें तसें कोणी कर्म-योगें हि आणिक

२५ स्वयें नेणूनियां कोणी थोरांपासूनि ऐकिती
तरती ते हि मृत्यूस श्रद्धेनें वर्तुनी तसें ॥

[४२]

२६ उत्पन्न होतसे लोकीं जें जें स्थावर-जंगम
क्षेत्र-क्षेत्रज्ञ-संयोगें घडिलें जाण सर्व तें

२७ समान सर्व भूतांत राहिला परमेश्वर
अनाशी नाशवंतांत जो पाहे तो चि पाहतो

२८ जो पाहे प्रभु सर्वत्र भरला सम तो स्वयें
आत्म्याची न करी हिंसा गति उत्तम मेळवी ।

२९ प्रकृतीच्या चि तंत्रानें कर्में होतात सर्व हि
आत्मा तो न करी कांहीं हें पाहे तो चि पाहतो

३० एकत्वीं जोडिलें पाहे भूतांचें वेगळेपण
त्यामधूनि चि विस्तार तेव्हां ब्रह्मत्व लाभलें ।

३१ परमात्मा न वेंचे चि कीं निर्गुण अनादि हा
राहे देहीं परी कांहीं न करी न मळे चि तो

३२ सर्व व्यापूनि आकाश सूक्ष्मत्वें न मळे जसें
सर्वत्र भरला देहीं आत्मा तो न मळे तसा

३३ एकला चि जसा सूर्य उजळी भुवन-त्रय
तसा क्षेत्रज्ञ तो क्षेत्र संपूर्ण उजळीतसे ।

३४ पाहती ज्ञान-दृष्टीनें क्षेत्र-क्षेत्रज्ञ-भेद हा
भूत-प्रकृति लंघूनि ते ब्रह्म-पद पावती ॥

# अध्याय चौदावा

## [ ४३ ]

श्रीभगवान् म्हणाले

१ सर्व ज्ञानांमधें थोर ज्ञान तें सांगतों पुन्हां
जें जाणूनि इथें मोक्ष पावले सगळे मुनि

२ ह्या ज्ञानाच्या बळानें ते झाले माझ्या चि सारखे
जगें येवोत जावोत ते अभंग जसे तसे ।

३ माझें प्रकृति हें क्षेत्र तिथें मी बीज पेरितों
त्यांतूनि सर्व भूतांची उत्पत्ति मग होतसे

४ सर्व योनींमधें मूर्ति जितुक्या जन्म पावती
माता प्रकृति ही त्यांस पिता मी बीज पेरिता ॥

५ प्रकृतीपासुनी होती गुण सत्त्व-रजस्-तम
ते निर्विकार आत्म्यास जणूं देहांत जुंपिती ।

६ त्यांत निर्मळ तें सत्त्व ज्ञान आरोग्य वाढवी
मी सुखी आणि मी ज्ञानी शृंखला ही चि लेववी
७ रज तें वासना-रूप तृष्णा आसक्ति वाढवी
आत्म्यास कर्म-संगानें टाकितें जखडूनि तें
८ गुंगवी तम सर्वांस अज्ञान चि विरूढलें
झोंप आळस दुर्लक्ष ह्यांनीं घेरूनि बांधितें ।
९ सुखांत घालितें सत्त्व रज कर्मांत घालितें
ज्ञान झांकूनि संपूर्ण दुर्लक्षीं घालितें तम ॥

१० अन्य दोघांस जिंकूनि तिसरें करितें बळ
असें चढे कधीं सत्त्व कधीं रज कधीं तम ।
११ प्रज्ञेचा इंद्रिय-द्वारा प्रकाश सगळीकडे
देहांत पसरे तेव्हां जाणावें सत्त्व वाढलें
१२ प्रवृत्ति लालसा लोभ कर्मारंभ अशांतता
हीं देहीं उठती तेव्हां जाणावें रज वाढलें
१३ अंधार मोह दुर्लक्ष अप्रवृत्ति चहूंकडे
देहांत माजलीं तेव्हां जाणावें तम वाढलें ॥

१४ वाढलें असतां सत्त्व जाय जो देह सोडुनी
जन्मतो शुभ लोकांत तो ज्ञात्यांच्या समागमीं

१५ रजांत लीन झाला तो कर्मासक्तांत जन्मतो
तमीं बुडूनि गेला तो मूढ-योनींत जन्मतो।

१६ फळ सात्त्विक कर्माचें पुण्य निर्मळ बोलिलें
रजाचें फळ तें दुःख तमाचें ज्ञान-शून्यता

१७ सत्त्वांतूनि निघे ज्ञान निघे लोभ रजांतुनी
अज्ञान मोह दुर्लक्ष निघती हीं तमांतुनी

१८ सत्त्व-स्थ चढती उंच मध्यें राजस राहती
हीन-वृत्तींत वागूनि जाती तामस खालती॥

१९ गुणांविण नसे कर्ता आत्मा तो त्यांपलीकडे
देखणा ओळखे हें जो होय माझें चि रूप तो

२० देह-कारण हे तीन गुण जाय तरूनि जो
जन्म-मृत्यु-जरा-दुःखीं सोडिला मोक्ष गांठतो॥

[ ४४ ]

अर्जुन म्हणाला

२१ त्रिगुणातीत जो देवा त्याचें लक्षण काय तें
वागणूक कशी त्याची कसा तो गुण निस्तरे ।

श्रीभगवान् म्हणाले

२२ प्रकाश मोह उद्योग गुण-कार्यें निसर्गतां
पावतां न करी खेद न धरी आस लोपतां

२३ राहे जसा उदासीन गुणांनीं जो न चाळवे
त्यांचा चि खेळ जाणूनि न डोले लेश-मात्र हि ।

२४ आत्मत्वें सम जो पाहे सोनें पाषाण मृत्तिका
धैर्यवंत सुखें दुःखें स्तुति-निंदा प्रियाप्रिय

२५ मानापमान जो नेणे नेणे जो शत्रु-मित्र हि
आरंभ सोडिले ज्यानें तो गुणातीत बोलिला ।

२६ जो एक-निष्ठ भक्तीनें अखंड मज सेवितो
तो ह्या गुणांस लंघूनि शके ब्रह्मत्व आकळूं

२७ ब्रह्मास मी चि आधार अवीट अमृतास मी
मी चि शाश्वत धर्मास आत्यंतिक सुखास मी ॥

# अध्याय पंधरावा

## [४५]

श्रीभगवान् म्हणाले

१ खालीं शाखा वरी मूळ नित्य अश्वत्थ बोलिला
ज्याच्या पानांमधें वेद जाणे तो वेद जाणतो।

२ वरी हि शाखा फुटल्या तयास
हीं भोग-पानें गुण-पुष्ट जेथें
खालीं हि मूळें निघती नवीन
दृढावलीं कर्म-बळें नृ-लोकीं

३ ह्याचें तसें रूप दिसे न येथें
भासे न शेंडा बुडखा न खांदा।
घेऊनि वैराग्य अभंग शस्त्र
तोडूनियां हा दृढ-मूल वृक्ष

४ घ्यावा पुढें शोध तया पदाचा
जेथूनि मागें फिरणें नसे चि
द्यावी बुडी त्या परमात्म-तत्त्वीं
प्रवृत्ति जेथें स्फुरली अनादि ।

५ जे मान-मोहांसह संग-दोष
जाळूनि निर्वासन आत्म-निष्ठ
द्वंद्वें न घेती सुख-दुःख-मूळ
ते प्राज्ञ त्या नित्य-पदीं प्रविष्ट ।

६ न त्यास उजळी सूर्य कायसे अग्नि-चंद्र हे
जेथ गेला न परते माझें अंतिम धाम तें ॥

[४६]

७ माझा चि अंश संसारीं झाला जीव सनातन
पंचेंद्रियें मनोयुक्त प्रकृतींतूनि खेंचितो
८ पुष्पादिकांतुनी वारा गंध खेंचूनि घेतसे
तशीं घेऊनि हीं सर्व देह सोडी धरी प्रभु
९ श्रोत्र जिह्वा त्वचा चक्षु घ्राण आणिक तें मन
ह्या सर्वांस अधिष्ठूनि ते ते विषय सेवितो ।

१० सोडितो धरितो देह भोगितो गुण-युक्त हा
परी न पाहती मूढ ज्ञानी डोळस पाहती

११ योगी यत्न-बळें ह्यास पाहती हृदयीं स्थित
चित्त-हीन अशुद्धात्मे प्रयत्नें हि न पाहती ॥

[ ४७ ]

१२ सूर्यांत जळतें तेज जें विश्व उजळीतसे
तसें चंद्रांत अग्नींत जाण माझें चि तेज तें

१३ आकर्षण-बळें भूतें धरा-रूपें धरीतसें
वनस्पतींस मी सोम पोषितों भरिला रसें

१४ मी वैश्वानर-रूपानें प्राणि-देहांत राहुनी
अन्नें तीं पचवीं चारी प्राणापानांस फुंकुनी

१५ सर्वांतरीं मी करितों निवास
देतों स्मृति ज्ञान विवेक सर्वां
समग्र वेदांस हि मी चि वेद्य
वेद-ज्ञ मी वेद-रहस्य-कर्ता ॥

[४८]

१६ लोकीं पुरुष ते दोन क्षर आणिक अक्षर
क्षर सर्व चि हीं भूतें स्थिर अक्षर बोलिला

१७ म्हणती परमात्मा तो तिजा पुरुष उत्तम
विश्व-पोषक विश्वात्मा जो विश्वेश्वर अव्यय

१८ मी क्षरा-अक्षराहूनि वेगळा आणि उत्तम
वेद लोक म्हणे मातें म्हणूनि पुरुषोत्तम ।

१९ मोह सारूनि जो दूर जाणे मी पुरुषोत्तम
सर्व-ज्ञ तो सर्व-भावें सर्व-रूपीं भजे मज

२० अत्यंत गूढ हें शास्त्र निर्मळा तुज बोलिलों
हें जाणे तो बुद्धिमंत होईल कृत-कृत्य चि ॥

# अध्याय १६ वा

## [४९]

श्रीभगवान् म्हणाले

१ निर्भयत्व मनःशुद्धि योग-ज्ञानीं सुनिश्चय
यज्ञ निग्रह दातृत्व स्वाध्याय ऋजुता तप

२ अहिंसा शांति अक्रोध त्याग सौजन्य सत्यता
अ-लुब्धता दया भूतीं मर्यादा स्थैर्य मार्दव

३ पवित्रता क्षमा तेज धैर्य अद्रोह नम्रता
हे त्याचे गुण जो आला दैवी संपत्ति घेउनी ।

४ दंभ मीपण अज्ञान क्रोध दर्प कठोरता
लाभती गुण हे त्यास ज्याची संपत्ति आसुरी ।

५ सुटका करिते दैवी आसुरी बंध घालिते
भिऊं नको चि आलास दैवी संपत्ति जोडुनी ॥

[५०]

६ भूत-सृष्टि जगीं दोन दैवी आणिक आसुरी
विस्तारें वर्णिली दैवी आसुरी ऐक सांगतों ।

७ कृत्याकृत्य कसें काय नेणती आसुरी जन
न स्वच्छता न आचार जाणती ते न सत्य हि

८ म्हणती लटिकें विश्व निराधार निरीश्वर
काम-मूलक हें सारें कोठलें सह-कार्य तें

९ स्वीकारूनि अशी दृष्टि नष्टात्मे ज्ञान-हीन ते
जगताच्या क्षयासाठीं निघाले रिपु हिंसक ।

१० काम दुर्भर सेवूनि मानी दांभिक माजले
दुराग्रह-बळें मूढ करिती पाप निश्चयें

११ अपार धरिती चिंता जी मेल्या हि सरे चि ना ।
गढले काम-भोगांत जणूं सर्वस्व मानुनी

१२ आशेचे लेइले फांस काम-क्रोधांत तत्पर
भोगासाठीं अधर्मानें इच्छिती धन-संचय ।

१३ हें आज लाभलें आतां तो जोडीन मनोरथ
हें आहे तें हि होईल माझें चि सगळें धन

१४ मीं मारिला चि तो शत्रु मारीन दुसरे हि जे
मी स्वामी आणि मी भोक्ता सुखी मी सिद्ध मी बळी

१५ कुलीन मी चि संपन्न माझी जोडी कुठें असे
यज्ञ-दान-विलासी मी जल्पती अज्ञ मोहित

१६ भ्रमले चित्त भेदूनि मोह-जालांत गुंतले
पडती विषयासक्त नरकांत अमंगळ।

१७ स्वयं-पूजित गर्विष्ठ धनें मानें मदांध ते
नांवाचे करिती यज्ञ दंभानें अव्यवस्थित

१८ अहंकारें बळें दर्पे काम-क्रोधें भरूनियां
माझा स्व-पर-देहांत करिती द्वेष मत्सरी

१९ द्वेषी क्रूर असे पापी संसारीं हीन जे जन
त्यांस मी टाकितों नित्य तशा योनींत आसुरी

२० जोडूनि आसुरी योनि जन्मजन्मांतरीं मग
मातें न मिळतां जाती उत्तरोत्तर खालती ॥

[५१]

२१ काम क्रोध तसा लोभ आत्म-नाशास कारण
तीन हीं नरक-द्वारें टाळावीं चि म्हणूनियां

२२ तमाचीं हीं तिन्ही द्वारें टाळूनि सुटला मग
कल्याण-मार्ग सेवूनि पावे उत्तम तो गति।

२३ जो शास्त्र-मार्ग सोडूनि करितो स्वैर वर्तन
न सिद्धि लाभते त्यास न वा सुख न सद्-गति

२४ म्हणूनि आदरीं शास्त्र कार्याकार्य कळावया
शास्त्राचें वाक्य जाणूनि इथें तूं कर्म आचरीं॥

# अध्याय सतरावा

## [५२]

अर्जुन म्हणाला

१ जे शास्त्र-मार्ग सोडूनि श्रद्धा-पूर्वक पूजिती
त्यांची सात्त्विक ती निष्ठा किंवा राजस तामस।

श्रीभगवान् म्हणाले

२ तिन्ही प्रकारची श्रद्धा स्वभावें जीव मेळवी
एक सात्त्विक ती होय तशी राजस तामस

३ जसा स्वभाव तो ज्याचा श्रद्धा त्याची तशी असे
श्रद्धेचा घडिला जीव जशी श्रद्धा तसा चि तो

४ सत्त्व-स्थ पूजिती देव यक्ष-राक्षस राजस
प्रेतें आणि भुतें-खेतें पूजिती लोक तामस।

५ शास्त्रें निषेधिलें घोर दंभें आचरिती तप
अभिमानास पेटूनि काम-रागें बळावले

६ देह-धातूंस शोषूनि मज आत्म्यास पीडिती
विवेक-हीन जे त्यांची निष्ठा ती जाण आसुरी॥

[५३]

७ आहारांत हि सर्वांच्या तीन भेद यथा-रुचि
तसे यज्ञीं तपीं दानीं सांगतों भेद ऐक ते ।

८ सत्त्व प्रीति सुख स्वास्थ्य आयुष्य बळ वाढवी
रसाळ मधुर स्निग्ध स्थिर आहार सात्त्विक

९ खारे रूक्ष कडू तीख अम्ल अत्युष्ण दाहक
दुःख-शोक-द आहार रोग-वर्धक राजस

१० रस-हीन निवालेलें शिळें दुर्गंध-युक्त जें
निषिद्ध आणि उष्टें हि तामस-प्रिय भोजन ।

११ फलाभिलाष सोडूनि कर्तव्य चि म्हणूनियां
विधीनें मन लावूनि होय तो यज्ञ सात्त्विक

१२ फळाचें अनुसंधान राखुनी दंभ-पूर्वक
लोकांत यजिला जाय जाण तो यज्ञ राजस

१३ नसे विधि नसे मंत्र अन्नोत्पत्ति नसे जिथें
नसे श्रद्धा नसे त्याग बोलिला यज्ञ तामस ।

१४ गुरु-देवादिकीं पूजा स्वच्छता वीर्य-संग्रह
अहिंसा ऋजुता अंगीं देहाचें तप बोलिलें

१५ हितार्थ बोलणें सत्य प्रेमानें न खुपेलसें
स्वाध्याय करणें नित्य वाणीचें तप बोलिलें

१६ प्रसन्न-वृत्ति सौम्यत्व आत्म-चिंतन संयम
भावना राखणें शुद्ध मनाचें तप बोलिलें ।

१७ तिहेरी तप तें सारें श्रद्धा उत्कट जोडुनी
समत्वें फळ सोडूनि घडलें जाण सात्त्विक

१८ सत्कारादिक इच्छूनि केलें जें दंभ राखुनी
तें चंचल इथें जाण तप राजस अस्थिर

१९ दुराग्रहें चि जें होय अंतरात्म्यास पीडुनी
किंवा जें पर-घातार्थ जाण तामस तें तप ।

२० देशीं काळीं तसें पात्रीं उपकार न इच्छितां
धर्म-भावें चि जें देणें जाण तें दान सात्त्विक

२१ उपकार अपेक्षूनि अथवा फळ वांछुनी
क्लेश-पूर्वक जें देणें जाण तें दान राजस

२२ करूनि भावना तुच्छ देशादिक न पाहतां
अनादरें चि जें देणें जाण तें दान तामस ॥

[५४]

२३ ॐ-तत्-सत् ह्यापरी ब्रह्म तिहेरी स्मरलें असे
त्यांतूनि निर्मिले पूर्वीं वेद यज्ञ उपासक

२४ म्हणूनि आधीं ॐ-कार उच्चारूनि उपासक
यज्ञ-दान-तपें उक्त निरंतर अनुष्ठिती

२५ तत्-कार-स्मरणें सर्व तोडूनि फल-वासना
नाना यज्ञ तपें दानें करिती मोक्ष लक्षुनी

२६ सत्-कार-स्मरणें लाभे सत्यता आणि साधुता
तशी सुंदरता कर्मीं सत्-कारें बोलिली असे

२७ यज्ञ-दान-तपें किंवा कर्में जीं त्यांस साधक
वागणें ह्यापरी त्यांत सत्-कार-फळ बोलिलें ।

२८ यज्ञ दानें तपें कर्में अश्रद्धेनें अनुष्ठिलीं
बोलिलीं सर्व तीं मिथ्या दोन्ही लोकांत निष्फळ ॥

# अध्याय अठरावा

## [ ५५ ]

अर्जुन म्हणाला

१ संन्यासाचें कसें तत्त्व त्यागाचें हि कसें असे
मी जाणूं इच्छितों कृष्णा सांगावें वेगवेगळें ।

श्रीभगवान् म्हणाले

२ सोडणें काम्य कर्मे तो ज्ञाते संन्यास जाणती
फळ सर्व चि कर्मांचें सोडणें त्याग बोलती ।

३ दोष-रूप चि हीं कर्मे सोडावीं म्हणती कुणी
न सोडावीं चि म्हणती यज्ञ-दान-तपें कुणी

४ तरी ह्याविषयीं ऐक माझा निश्चित निर्णय
त्याग जो म्हणती तो हि तिहेरी भेदला असे ।

५ यज्ञ-दान-तपें नित्य करणीय अवश्यक
न सोडावीं चि तीं होती ज्ञानवंतास पावक

६ परी हीं पुण्य-कर्में हि ममत्व फळ सोडुनी
करणें योग्य हा माझा जाण उत्तम निर्णय।

७ नेमिलें कार्य जें त्याचा संन्यास न जुळे चि तो
केला तसा जरी मोहें त्याग तामस बोलिला

८ कष्टामुळें चि जें कर्म सोडणें आंग राखुनी
त्याग राजस तो वांझ न देखे आपुलें फळ

९ करणें नेमिलें कर्म कर्तव्य चि म्हणूनियां
ममत्व फळ सोडूनि त्याग तो मान्य सात्त्विक।

१० कर्मीं शुभाशुभीं जेव्हां राग-द्वेष न राखतो
सत्त्वांत मुरला त्यागी ज्ञानें छेदूनि संशय

११ अशक्य देहवंतास सर्वथा कर्म सोडणें
म्हणूनि जो फल-त्यागी तो त्यागी बोलिला असे

१२ तिहेरी फळ कर्मांचें बरें वाईट मिश्रित
त्याग-हीनास तें लाभे संन्यासी मुक्त त्यांतुनी॥

[५६]

१३ ऐक तूं मजपासूनि ज्ञात्यांचा कर्म-निर्णय
परभारें चि हें कर्म करिती पांच कारणें

१४ अधिष्ठान अहंकार तशीं विविध साधनें
वेगळाल्या क्रिया नाना दैव तें येथ पांचवें

१५ काया-वाचा-मनें जें जें मनुष्य करितो जगीं
धर्माचें वा अधर्माचें त्याचीं हीं पांच कारणें।

१६ तेथ जो शुद्ध आत्म्यास कर्ता मानूनि बैसला
संस्कार-हीन तो मूढ तत्त्व नेणे चि दुर्मति

१७ नसे ज्यास अहंभाव नसे बुद्धींत लिप्तता
मारी विश्व जरी सारें न मारी चि न बांधिला ॥

[५७]

१८ ज्ञाता ज्ञेय तसें ज्ञान तिहेरी कर्म-बीज हें
क्रिया करण कर्तृत्व कर्मांगें तीन त्यांतुनी

१९ ज्ञाना-कर्मांत कर्त्यांत त्रिगुणीं तीन भेद जे
रचिले ते कसे ऐक गुण-तत्त्वज्ञ वर्णिती ।

[stamp]

२० भूत-मात्रांत जें पाहे भाव एक सनातन
अभिन्न भेदलेल्यांत जाण तें ज्ञान सात्त्विक

२१ भेद-बुद्धीस पोषूनि सर्व भूतांत पाहतें
वेगळे वेगळे भाव जाण तें ज्ञान राजस

२२ एका देहांत सर्वस्व मानुनी गुंतलें वृथा
भावार्थ-हीन जें क्षुद्र जाण तें ज्ञान तामस ।

२३ नेमिलें जें न गुंतूनि राग-द्वेष न राखतां
केलें निष्काम-वृत्तीनें कर्म तें होय सात्त्विक

२४ धरूनि कामना चित्तीं जें अहंकार-पूर्वक
केलें महा खटाटोपें कर्म तें होय राजस

२५ विनाश वेंच निष्पत्ति सामर्थ्य हि न पाहतां
आरंभिलें चि जें मोहें कर्म तें होय तामस ।

२६ निःसंग निरहंकार उत्साही धैर्य-मंडित
फळो जळो चळे ना तो कर्ता सात्त्विक बोलिला

२७ फल-कामुक आसक्त लोभी अस्वच्छ हिंसक
मारिला हर्ष-शोकें तो कर्ता राजस बोलिला

२८ स्वच्छंदी क्षुद्र गर्विष्ठ घातकी शठ आळशी
दीर्घ-सूत्री सदा खिन्न कर्ता तामस बोलिला ॥

२९ बुद्धीचे भेद जे तीन धृतीचे हि तसे चि जे
गुणानुसार ते सारे सांगतों वेगवेगळे ।

३० अकर्तव्यें बंध-भय कर्तव्यें मोक्ष निर्भय
जाणे सोडूं धरूं त्यांस बुद्धि सात्त्विक ओळख

३१ कार्याकार्य कसें काय काय धर्म अधर्म तो
जी जाणूं न शके चोख बुद्धि राजस ओळख

३२ धर्म मानी अधर्मास अंधारें भरली असे
अर्थ जी उलटा देखे बुद्धि तामस ओळख ।

३३ जी इंद्रियें मन प्राण ह्यांचे व्यापार चालवी
समत्वें स्थिर राहूनि धृति सात्त्विक जाण ती

३४ धर्मार्थकाम सारे चि चालवी सोय पाहुनी
बुडवी जी फलाशेंत धृति राजस जाण ती

३५ निद्रा भय न जी सोडी शोक खेद तसा मद
घाली झांपड बुद्धीस धृति तामस जाण ती ॥

३६ तिन्ही प्रकारचें आतां सांगतों सुख ऐक तें
अभ्यासें गोड जें होय दुःखाचा अंत दाखवी

३७ जें कडू विख आरंभीं अंतीं अमृत-तुल्य चि
आत्म्यांत शुद्ध बुद्धीस लाभलें सुख सात्त्विक

३८ आरंभीं गोडसें वाटे अंतीं मारक जें विख
भासे विषय-संयोगें इंद्रियां सुख राजस

३९ निद्रा आळस दुर्लक्ष ह्यांनीं आत्म्यास घेरुनी
आरंभीं परिणामीं हि गुंगवी सुख तामस ।।

.

४० इथें पृथ्वीवरी किंवा स्वर्गीं देवादिकांत हि
कांहीं कुठें नसे मुक्त प्रकृतीच्या गुणांतुनी ।।

[५८]

४१ ब्राह्मणादिक वर्णांचीं कर्में तीं तीं विभागिलीं
स्वभाव-सिद्ध जे ज्याचे गुण त्यांस धरूनियां

४२ शांति क्षमा तप श्रद्धा ज्ञान विज्ञान निग्रह
ऋजुता आणि पावित्र्य ब्रह्म-कर्म स्वभावतां

४३ शौर्य धैर्य प्रजा-रक्षा युद्धीं हि अ-पलायन
दातृत्व दक्षता तेज क्षात्र-कर्म स्वभावतां

४४ शेती व्यापार गो-रक्षा वैश्य-कर्म स्वभावतां
करणें पडिली सेवा शूद्र-कर्म स्वभावतां ॥

४५ आपुल्या आपुल्या कर्मीं दक्ष तो मोक्ष मेळवी
ऐक लाभे कसा मोक्ष स्व-कर्मीं लक्ष लावुनी

४६ जो प्रेरी भूत-मात्रास ज्याचा विस्तार विश्व हें
स्व-कर्म-कुसुमीं त्यास पूजितां मोक्ष लाभतो।

४७ उणा हि आपुला धर्म पर-धर्माहुनी बरा
स्वभावें नेमिलें कर्म करी तो दोष जाळितो

४८ सहज-प्राप्त तें कर्म न सोडावें सदोष हि
दोष सर्व चि कर्मांत राहे अग्नींत धूर तो

४९ राखे कुठें न आसक्ति जिंकूनि मन निःस्पृह
तो नैष्कर्म्य महा-सिद्धि पावे संन्यास साधुनी॥

नों. दि. १०५७३

५० सिद्धीस लाभला ब्रह्म गांठी कोण्योपरी मग
ज्ञानाची थोर ती निष्ठा ऐक थोड्यांत सांगतों ।

५१ बुद्धि सात्त्विक जोडूनि धृतीचा दोर खेंचुनी
शब्दादि-स्पर्श टाळूनि राग-द्वेषांस जिंकुनी

५२ चित्त वाचा तनू नेमी एकांतीं अल्प सेवुनी
गढला ध्यान-योगांत दृढ वैराग्य लेउनी

५३ बळ दर्प अहंकार काम क्रोध परिग्रह
ममत्वासह सोडूनि शांतीनें ब्रह्म आकळी ।

५४ ब्रह्म झाला प्रसन्नत्वें न करी शोक कामना
पावे माझी परा भक्ति देखे सर्वत्र साम्य जी

५५ भक्तीनें तत्त्वतां जाणे कोण मी केवढा असें
ह्यापरी मज जाणूनि माझ्यांत मिसळे मग

५६ करूनि हि सदा कर्मे सगळीं मज सेवुनी
पावे माझ्या कृपेनें तो अवीट पद शाश्वत ॥

[५९]

५७ मज मत्पर-वृत्तीनें सर्व कर्में समर्पुनी
समत्व न ढळूं देतां चित्त माझ्यांत ठेव तूं

५८ मग सर्व भयें माझ्या कृपेनें तरशील तूं
मीपणें हें न मानूनि पावशील विनाश चि।

५९ म्हणसी मी न झुंजें चि हें जें मीपण घेउनी
तो निश्चय तुझा व्यर्थ स्वभाव करवील चि

६० स्वभाव-सिद्ध कर्मानें आपुल्या बांधिलास तूं
जें टाळूं पाहसी मोहें अवश्य करिशील तें।

६१ राहिला सर्व भूतांच्या हृदयीं परमेश्वर
मायेनें चाळवी त्यांस जणूं यंत्रांत घालुनी

६२ त्यातें चि सर्व-भावें तूं जाई शरण पावसी
त्याच्या कृपा-बळें थोर शांतीचें स्थान शाश्वत।

६३ असें गूढाहुनी गूढ बोलिलों ज्ञान मी तुज
ध्यानीं घेऊनि तें सारें स्वेच्छेनें योग्य तें करीं॥

६४ सर्व गूढांतलें गूढ पुन्हां उत्तम वाक्य हें
हितार्थ सांगतों ऐक फार आवडसी मज

६५ प्रेमानें ध्यास घेऊनि यजीं मज नमीं मज
प्रिय तूं मिळसी मातें प्रतिज्ञा जाण सत्य ही

६६ सगळे धर्म सोडूनि एका शरण ये मज
जाळीन सर्व मी पापें तुझीं [illegible] ।।

[६०]

REFBK-0007848

६७ न कथीं हें कधीं त्यास त [illegible]
श्रवणेच्छा नसे ज्यास माझा मत्सर जो करी ।

६८ सांगेल गूज हें थोर माझ्या भक्त-गणांत जो
तो त्या परम भक्तीनें मिळेल मज निश्चित

६९ कोणी अधिक त्याहूनि माझें प्रिय करी चि ना
जगीं आवडता कोणी न होय मज त्याहुनी

७० हा धर्म-रूप संवाद जो अभ्यासील आमुचा
मी मानीं मज तो पूजी ज्ञान-यज्ञ करूनियां

७१ हें ऐकेल हि जो कोणी श्रद्धेनें द्वेष सोडुनी
पावेल कर्म-पूतांची तो हि निर्वेध सद्-गति ।।

७२ तूं हें एकाग्र चित्तानें अर्जुना ऐकिलेंस कीं
अज्ञान-रूप तो मोह गेला संपूर्ण कीं तुझा ।

अर्जुन म्हणाला

७३ मोह मेला चि तो देवा कृपेनें स्मृति लाभली
झालों निःशंक मी आतां करीन म्हणसी तसें ॥

संजय म्हणाला

७४ असा कृष्णार्जुनांचा हा झाला संवाद अद्भुत
थोरांचा ऐकिला तो मीं नाचवी रोम रोम जो
७५ व्यास-देवें कृपा केली थोर योग-रहस्य हें
मीं योगेश्वर कृष्णाच्या मुखें प्रत्यक्ष ऐकिलें
७६ हा कृष्णार्जुन-संवाद राया अद्भुत पावन
आठवूनि मनीं फार हर्षतों हर्षतों चि मी
७७ स्मरूनि बहु तें रूप हरीचें अति अद्भुत
राया विस्मित होऊनि नाचतों नाचतों चि मी
७८ योगेश्वर जिथें कृष्ण जिथें पार्थ धनुर्धर
तिथें मी पाहतों नित्य धर्म श्री जय वैभव ॥

[ गीताई संपूर्ण ]

९ सत्तावीस् ईश्वरी सत्ता अठ्ठावीस् हरि-भावना
नव्वीस् निष्कामता-भक्ति तीस ईश-समर्पण ।
१० एकुतीस् विभूति-संक्षेप बत्तीस् त्यांचा चि विस्तर ।
११ तेतीस् तें ईश्वरी रूप चौतीस् तदवलोकन
पस्तीस् क्षमापन-स्तोत्र छत्तीस् रूप-विसर्जन ।
१२ सदतीस् भक्त-तुलना अडतीस् सुलभ साधनें
नौतीस् ईश्वर-भक्ताचे गाइले गुण गोड जे ॥ ४ ॥

१३ चाळीस् झाडूनियां क्षेत्र केलें क्षेत्रज्ञ-शोधन
एकेचाळ् प्रकृति-त्याग बेचाळ् निर्लिप्त आत्मता ।
१४ त्रेचाळ् त्रिगुण-संसार चव्वेचाळ् गुण-मुक्त जो ।
१५ पंचेचाळ् छेदिला वृक्ष शेचाळ् जीवात्म-दर्शन
सत्तेचाळ् जीवनीं व्याप्त अठ्ठेचाळ् पुरुषोत्तम ॥ ५ ॥

१६ नव्वेचाळ् संपदा दोन पन्नास् असुर-वर्णना
एकावन् नरक-द्वारें टाळूं शास्त्रीय संयमें ।
१७ बावन् विभागिली श्रद्धा स्वाभाविक गुणीं त्रिधा
त्रेपन् आहार-यज्ञादि चोपन् ॐ-तत्-सदर्पण ॥ ६ ॥

१८ पंचावन् त्याग-मीमांसा छप्पन्नीं कर्म-निर्णय
सत्तावन् त्रिविधा वृत्ति अठ्ठावन् पूर्ण साधना
नव्वावन् अर्जुना बोध साठीं ग्रंथ समापिला ॥ ७ ॥

ॐ श्रीकृष्णार्पणमस्तु ।

हरये नमः । हरये नमः । हरये नमः ॥

# सहायक ग्रंथ

**गीता-प्रवचनें** कि. १॥ रु.

"या प्रवचनांची भाषा सोपी, सरळ, धावती, मार्मिक दृष्टांतांनीं भरलेली, व गीतेच्या मुख्य विचाराचा स्पष्ट उकल करून दाखविणारी आहे. मानवाच्या रोजच्या जीवनाला वळण कसें द्यावें हें या प्रवचनांच्या पानापानांतून आढळतें."

**स्थितप्रज्ञ-दर्शन** कि. १॥ रु.

गीतेच्या दुसऱ्या अध्यायाच्या शेवटीं अठरा श्लोकांत स्थितप्रज्ञाचें गंभीर आणि उदात्त चरित्र वर्णिलें आहे. ह्या अठरा श्लोकांत गीतेच्या अठरा अध्यायांचें जणूं सारच सांठविलें आहे. स्थितप्रज्ञ गीतेची आदर्श-मूर्ति आहे. ग्रंथकारानें प्रस्तुत पुस्तकांत ह्याच मूर्तीचें सर्वांगीण दर्शन करून दिलें आहे.

**गीताध्याय-संगति** कि. १ आणा

पूज्य गांधीजींच्या पत्राच्या उत्तरांत लिहिलेला निबंध; ज्याबाबत गांधीजींनीं लिहिलें आहे—"मैने मांगा था बहुत कम, विनोबाने बहुत दिया."

**गीताई-शब्दार्थ-कोश** कि. ४॥ रु.

यांत यच्चयावत् सर्व शब्दांचा स्थलनिर्देशासह अर्थ दिला आहे. त्याशिवाय ग्रंथकर्त्यास अवश्यक वाटलें त्या ठिकाणीं विशेष टिप्पण्या हि तीनशेंच्या वर दिल्या आहेत. हा कोश सूक्ष्म अभ्यासूंना विशेष मार्गदर्शक आहे.

---


**ग्राम-सेवा-मंडळ, प्रकाशन-विभाग**

**नालवाडी, (वर्धा)**